भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२८१ ■ मंगळवार १४ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

।। श्री गणेशाय नमः ।।
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

## जेजुरी-बेलसर मार्गावर विठ्ठल भक्तांच्या अपघातात वारीतील तीन वारकऱ्यांचा मृत्यू, पाच लाखांची मदत



**पुणे, दि.१३- संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यादरम्यान आज सकाळी सासवड-जेजुरी मार्गावरील जेजुरी-बेलसर परिसरात झालेल्या अपघातात तीन वारकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर काही वारकरी जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी तातडीने जेजुरी ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन जखमी वारकऱ्यांची विचारपूस केली. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत देण्याची घोषणा केली आहे.**

अपघाताची माहिती समजल्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उपचाराधीन वारकऱ्यांच्या प्रकृतीची माहिती वैद्यकीय अधिका-यांकडून घेतली. जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधित प्रशासनाला दिल्या. अपघातात मृत्यू झालेल्या वारकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्यात येणार असून जखमी वारकऱ्यांवर शासनाच्या वतीने मोफत उपचार करण्यात येतील. आवश्यकतेनुसार आर्थिक मदतही उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली. यावेळी जेजुरी नगरपालिकेचे नगराध्यक्ष जयदीप दिलीप बारभाई, उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, श्री. ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ गुरु शांतीनाथ, भावार्थ देखणे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या की, जखमी वारकऱ्यांच्या उपचारामध्ये कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासन अपघातग्रस्त वारकरी व त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. (पान ४ वर)

### हर्षवर्धन सपकाळांचा आरोप
## लाडकी बहिण योजना साडेतीन ह.कोटींचा दरोडा

मुंबई, दि.१३- भारतीय जनता पक्षाच्या सरकारने असा एकही विभाग अथवा क्षेत्र सोडले नाही जेथे भ्रष्टाचार केला नाही. जाऊ तिथे खाऊ या म्हणीप्रमाणे केवळ भ्रष्टाचारच केला आहे. राम मंदिरातील भक्तांच्या देणगीवर दरोडा टाकून भाजपा आरएसएसवाल्यांचे पोट भरले नाही म्हणून की काय त्यांनी लाडकी बहिण योजनेवरही दरोडा टाकला आहे. सत्तेतील सावत्र भावांनी बहिणींनाही सोडले नाही. हे सरकार आहे का दरोडेखोरांची टोळी? असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, भाजप महायुती सरकारने मलाडकी बहीण योजने अंतर्गत कोट्यवधी रुपयांची अनियमितता (पान ४ वर)

## जागतिक मराठी परिवार राज्याच्या विकासाचा महत्त्वाचा भागीदार- मंत्री जयकुमार रावल

**मुंबई, दि. १३ - जगभरातील मराठी समाज हा महाराष्ट्राच्या विकासाचा महत्त्वाचा भागीदार असून त्यांचे ज्ञान, अनुभव, जागतिक संपर्क आणि गुंतवणूक राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मोलाची ठरणार आहे. त्यामुळे जगभरातील मराठी परिवाराशी अधिक परिणामकारक, सातत्यपूर्ण आणि संस्थात्मक संबंध प्रस्थापित करण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले.**



सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे आयोजित मध्यपूर्व आणि आफ्रिका डायस्पोरा आउटरीच या ऑनलाईन संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राजशिष्टाचार विभागाचे सचिव डॉ. राजेश गवांदे, विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, कतार, ओमान, बहरीन, कुवेत, दक्षिण आफ्रिका, केनिया, नायजेरिया, युगांडा आदी देशांतील महाराष्ट्र मंडळांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राजशिष्टाचार विभागाकडे थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) तसेच डायस्पोरा अफेअर्स अँड आउटरीच या नव्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. या माध्यमातून जगभरातील महाराष्ट्राच्या परिवाराशी दृढ, सातत्यपूर्ण आणि परिणामकारक संबंध निर्माण करण्याचे काम सुरू असून जागतिक मराठी समाजाला राज्याच्या विकास प्रक्रियेत सक्रिय भागीदार म्हणून जोडण्याचा शासनाचा प्रयतक आहे. (पान ४ वर)

## सरदार सरोवर करारावर तातडीने चर्चा करा विस्थापित व आदिवासींचे हित जपा : मेधा पाटकर

**नंदुरबार, दि.१३ (प्रतिनिधी)- सरदार सरोवर प्रकल्पासंदर्भात दिल्ली येथे महाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेश सरकारांदरम्यान झालेल्या वन टाइम सेटलमेंट करारावर राज्य शासनाने तातडीने सर्व संबंधित पक्षांसोबत चर्चा करावी आणि नर्मदा खोऱ्यातील विस्थापित, प्रकल्पग्रस्त तसेच आदिवासींचे हित अबाधित ठेवावे, अशी मागणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधाताई पाटकर यांनी पत्रकार परिषदेत केली.**




यावेळी लतिका राजपूत, चेतन भाऊ साळवे यासह नर्मदा बचाव आंदोलनाचे कार्यकर्ते उपस्थित होते. मेधाताई म्हणाल्या, सरदार सरोवर प्रकल्पातील वीजनिर्मितीमध्ये महाराष्ट्राचा २७% हिस्सा असून त्यानुसार राज्याने वीजनिर्मिती खर्चातील वाटा उचलण्याची तरतूद नर्मदा वॉटर डिस्प्युट्स ट्रिबूनल अवॉर्ड १९७९ मध्ये करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील बुडीत क्षेत्रासाठी भूसंपादन, पुनर्वसन व भरपाईचा खर्च गुजरात सरकारने (पान ४ वर)

### राम मंदिर दान चोरी प्रकरणी
## सर्वोच्च न्या.ने केंद्र व उ.प्रदेश सरकारला नोटीसा काढल्या

दिल्ली,दि.१३ - सुप्रीम कोर्टाने राम मंदीर भ्रष्टाचार प्रकरणात केंद्र सरकारसह उत्तरप्रदेश सरकार आणि राम मंदीर ट्रस्टला नोटीस बजावली आहे. देणगी भ्रष्टाचार प्रकरणाचा तपास उत्तर प्रदेश सरकारने नेमलेल्या विशेष तपास पथकाकडून केला जात आहे. त्या तपास समितीमध्ये तपास अधिकारी (एसआयटी मध्ये) कोणकोण आहेत त्या सर्वांची माहिती सर्वोच्च न्यायालयाने मागविली आहे. पुढील कामकाज २० जुलैला होणार आहे.

सरन्यायाधिश सुर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठ चार विविध याचिकांवर (पान ४ वर)

## मोहीदेतील विषबाधित दहा विद्यार्थी अद्याप रूग्णालयात जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनी घेतली सर्वांची भेट

**शहादा, दि.१३ (का.प्र.)- शहादा तालुक्यातील मोहीदे त.श. शिवारातील समाज कल्याण विभागाच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांच्या शासकीय निवासी शाळा व वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शनिवारी रात्री जेवणानंतर झालेल्या विषबाधेच्या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. या प्रकरणातील धक्कादायक वास्तव आता समोर येऊ लागले असून, घटनेला तीन दिवस उलटूनही समाज कल्याण विभागाच्या कारभारावर तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.**



शनिवारी रात्री येथील विद्यार्थ्यांनी शेवगा, भात व चपाती असे जेवण केल्यानंतर अचानक त्यांना मळमळ, उलट्या, डोकेदुखी व पोटदुखी सुरू झाली. प्रशासनाने तत्परता दाखवत बाधित विद्यार्थ्यांना तातडीने शहादा ग्रामीण रुग्णालय व खाजगी रुग्णालयात दाखल केले. एकूण ४० बाधित विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थ्यांना तीन दिवसांनंतर डिस्चार्ज देण्यात आला असून, उर्वरित १० विद्यार्थ्यांवर अद्यापही रुग्णालयात (पान ४ वर)

## दोनशे सत्तर धावांनी महिला संघ विजयी

मुंबई, दि.१३- इंग्लंडच्या लॉर्ड्स मैदानावर सुरू असलेल्या एकमेव कसोटी सामन्यात महिला भारतीय संघाने २७० धावांनी विजय मिळवला आहे. सुरुवातीपासूनच इंग्लंडवर वर्चस्व राखलेल्या भारतीय संघाने अखेरच्या म्हणजेच चौथ्या दिवशी अवघ्या दीड तासात इंग्लंडला ऑल आऊट केले व विजय साकारला. क्रिकेटची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लॉर्ड्स मैदानावर १४२ वर्षानंतर पहिल्यांदाच झालेल्या एकमेव सामन्यात भारताच्या महिलांनी इंग्लंड संघावर इतिहास रचला. या सामन्यामध्ये २२ वर्षीय क्रांती गौडने दोन डावात ७ विकेट आणि यास्तिका भाटियाची शतकी खेळी लक्षणीय ठरली.



## गावठी कट्टा व काडतूस बाळगणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेने पकडले

**धुळे, दि.१३- विना परवाना शस्त्र विक्रीच्या उद्देशाने गावठी कट्टा व तीन जिवंत राऊंड बाळगणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अभय कॉलेज जवळील परिसरात जेरबंद केले. स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने आज धडक कारवाई केली असून गुन्ह्याविषयी आणखी माहिती उघडकीस येण्याची शक्यता आहे.**

नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक धुळे यांनी अवैध शस्त्रांचा शोध घेवुन कारवाई करणेबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने आज स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना गोपनिय माहिती मिळाली, त्यानुसार मुंबई-आग्रा महामार्गावर अभय कॉलेज जवळील परिसरातुन सोमनाथ भिका पाटील (वय ३२) रा. देवभाने ता. धुळे, दीपक दगडु जगताप (वय २५) रा. अभय कॉलेज जवळ, साई प्रसाद कॉलनी, धुळे यांना विना परवाना शस्त्र विक्री करण्याचे उद्देशाने एक गावठी कट्टा (पिस्टल) व तीन जिवंत राऊंड बेकायदेशीररित्या बाळगल्याप्रकरणी ताब्यात घेतले. चाळीस हजार रुपये किंमतीचा एक देशी गावठी कट्टा (पिस्टल) मॅग्झीनसह, तीन हजारांचे तीन जिवंत काडतुस असा एकूण ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दोघा आरोपींना एक गावठी कट्टा (पिस्टल), जिवंत काडतुस मुद्देमालासह ताब्यात घेतले. दोघांविरुद्ध आझादनगर पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम कलम गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

अवैध शस्त्राची चौथी कारवाई

मुख्य संशयित सोमनाथ पाटील याचेकडुन दीपक जगताप शस्त्र खरेदी करणार होता. मागील दिवसांत धुळे शहरातील तिसरी व जिल्हयातील चौथी अवैध शस्त्राविरुध्दची कारवाई आहे. गुन्हयाचा सखोल तपास सुरु असून, मुळ (पान ४ वर)

## शिवाजी जनरल मार्केट पाडण्यास मनपाकडून सुरूवात; व्यापाऱ्यांनी साहित्य बाहेर काढले

**धुळे, दि.१३- धुळे शहरातील मुख्य बाजारपेठेतील पाच कंदील परिसरातील शंभर वर्षांहून अधिक जुने शिवाजी जनरल मार्केट पाडण्यासाठी सोमवारी सकाळी धुळे महानगरपालिकेचे पथक मोठ्या बंदोबस्तासह दाखल झाले. मात्र, अनेक दुकाने अद्याप पूर्णपणे खाली न झाल्याने व्यापाऱ्यांनी पथक आल्यानंतर घाईघाईने सामान बाहेर काढण्यास सुरुवात केली.**




पाच कंदील येथील हे मार्केट तत्कालीन नगरपालिकेने सुमारे शंभर वर्षांपूर्वी उभारले होते. या मार्केटमध्ये बाहेरच्या बाजूने वीस दुकाने तर आत मध्ये ६८ दुकाने आहेत. या मार्केटच्या इमारतीची मुदत संपल्याने तसेच काही भाडेकरूंनी दीर्घकाळ भाडे न भरल्याने ही इमारत पाडून त्या ठिकाणी आधुनिक बाजार संकुल उभारण्याचा (पान २ वर)

## बोरकुंडच्या फार्मसी महा.त बी-फार्मसी सुविधा केंद्र मंजूर

धुळे, दि.१३- बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानच्या कॉलेज ऑफ फार्मसीत बी.फार्मसी अभ्यासक्रम २०२३ पासून सुरू आहे. या महाविद्यालयात या वर्षापासुन सुविधा केंद्र (एफसी सेंटर) मंजूर झाले आहे. विद्यार्थ्यांना आता हे सुविधा केंद्र येथेच उपलब्ध होणार असल्याने विद्यार्थ्यांची मोठी सोय होणार आहे.

आयबीपीएस कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयात सुरू होणाऱ्या २०२६-२७ या नवीन वर्षाच्या प्रवेशासाठी ची कागदपत्रे व्हेरिफिकेशन आता महाविद्यालयातील या सुविधा केंद्रावर (फॅसिलिटी सेंटर) उपलब्ध असेल. (पान २ वर)




## किराणा दुकानातील रोकड चोरणाऱ्या दोघा आरोपींना चार तासातच अटक

**धुळे, दि.१३- शिरपूर शहरातील किराणा दुकानातून चौदा हजारांची रोकड चोरणाऱ्या दोघांना गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या चार तासातच पोलिसांनी अटक केली. दोघात सराईतांकडून बोकड जप्त केली असून आणखी कोणी उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**

शिरपूर येथील मनिष मोहनलाल अग्रवाल रा. बोहरी गल्ली, बालाजी मंदिर जवळ यांचे शिरपूर शहरात किराणा दुकानातुन आहे. चोरटयांनी दुकानातून चौदा हजारांची रोकड (पान २ वर)

## कंटेनर दुचाकीचा भिषण अपघात पिता-पुत्र ठार; आई गंभीर जखमी

**धुळे, दि.१३- मोहाडी परिसरातील सुरत वळण महामार्गालगत कंटेनरने दिलेल्या धडकेत मोटार सायकलस्वार पिता-पुत्र ठार, तर आई गंभीर जखमी झाली. मृत पुरमेपाडा (ता. धुळे) येथील रहिवासी आहेत. या प्रकरणी मोहाडी पोलिस ठाण्यात कंटेनर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला.**

जितेश ऊर्फ मयूर नंदलाल कुलकर्णी (वय ३६), मुलगा खुशाल (वय ५), मोनाली मयूर कुलकर्णी (वय ३०) सर्व रा. पुरमेपाडा रविवारी दि.११ जुलै रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास महामार्गावरून मोटारसायकलने येत होते. मोहाडी परिसरात नवीनच झालेल्या सरकारी रुग्णालयाकडे जाणाऱ्या रिंगरोडलगत हॉटेल आदेशसमोर त्यांच्या मोटरसायकलचा अपघात झाला. मागून भरधाव येणाऱ्या कंटेनरने क्र.जीजे २७/टीएफ-८६६९ ने पुढील मोटर सायकल क्र.एमएच १८/बीवाय-१००६ ला जोरदार (पान २ वर)

## ग्राहक पंचायत महाराष्ट्र जि.उपाध्यक्षपदी बोरसे





धुळे, दि.१३ - ग्राहक पंचायत महाराष्ट्र धुळे जिल्हा उपाध्यक्षपदी जगदीश बोरसे तर जिल्हा संघटकपदी प्रा.चंद्रकांत डागा यांची पुनर्निवड तसेच धुळे तालुकाध्यक्ष म्हणून भास्कर पाटील यांची निवड करण्यात आली.या नियुक्त्या ऑनलाईन बैठकीत जिल्हा अध्यक्ष अ‍ॅड.जे.टी. देसले यांनी केली.प्रास्ताविक प्रा.डागा यांनी केले. दिनांक ८ व ९ऑगस्ट रोजी शिवराज (पान २ वर)

## राजकीय सूडबुद्धीतून माझ्यावर खोटा गुन्हा सत्याचा विजय निश्चित- मा.आ.शिरीष चौधरी

**नंदुरबार, दि.१३ (प्रतिनिधी)- माझ्याविरुद्ध नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेला गुन्हा हा वस्तुस्थितीवर नव्हे, तर राजकीय सूडबुद्धीने प्रेरित असल्याचा माझा ठाम आरोप आहे. माझी राजकीय प्रतिमा मलिन करणे, जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणे आणि माझा आवाज दाबणे, हा या कारवाईमागील खरा हेतू आहे. मी कोणताही गैरव्यवहार केलेला नाही आणि कथित प्रकरणाशी माझा कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नाही. त्यामुळे अशा खोट्या गुन्ह्यांना मी अजिबात घाबरणार नसून, कायदेशीर मार्गाने सत्य जनतेसमोर आणणार आहे.**

नंदुरबार शहरातील विविध समाजांच्या सभागृहांसाठी व मंदिरांसाठी मंजूर झालेल्या सुमारे कोटी रुपयांच्या विकास निधीबाबत कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोप करून माझ्यासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, कोणतीही निष्पक्ष चौकशी न करता आणि सर्व बाजू पडताळून न पाहता ही कारवाई करण्यात आल्याने या संपूर्ण प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, संबंधित पत्र मी तयार केलेले नाही, त्यावर माझी स्वाक्षरी नाही आणि ते पत्र मी कोणाकडून आणलेलेही नाही. संबंधित नगरसेवक आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनीच डॉ. विजयकुमार गावित साहेबांच्या कार्यालयात ते पत्र जमा केले (पान ४ वर)

## ट्रकवरून पडल्याने एकाचा मृत्यू

धुळे, दि.१३- येथील चाळीसगाव रोड परिसरात ट्रकवर ताडपत्री बांधताना तोल जाऊन पडल्याने एकाचा मृत्यू झाला.

सादीक शब्बीर पिंजारी (वय ४५) रा. शहादा, जि. नंदुरबार असे त्याचे नाव आहे. शनिवारी दि.११ जुलै रोजी सकाळी दहाच्या सुमारास शंभर फुटी रोड अपनी हॉटेलसमोर येथे मालट्रक (एम एच १८/एए-१९५६ (पान २ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,30,550 रु.+3% GST
सोने- 24 K -1,42,500 रु.+3% GST
चांदी- 2,22,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## विविध योजनांचे मानधन त्वरित द्या शहादा ता.काँग्रेस कमिटीची मागणी

**शहादा,दि.१३(प्रतिनिधी)- शहादा तालुका काँग्रेस कमिटीच्यावतीने संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना, श्रावण बाळ योजनेतील नागरिकांना मानधन तात्काळ मिळणे बाबत तहसीलदार संभाजी पाटील यांना निवेदन देण्यात आले.**




निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आमच्या कन्साई गटातील लिबर्डी, नवागाव, कन्साई, विरपूर, दरा, चिंचोरा, पिंपराणी, चिरडे, लक्कडकोट, राणीपूर, नागझिरी, कोटबांधणी, साबलापाणी येथील संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना तसेच श्रावण बाळ योजनेतील वयोवृद्ध नागरिकांचे मागील चार महिन्यांपासून मानधन थकीत आहे. सध्या दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्याने परिवारास कोणतेही कामधंदे नाहीत. औषध पाणी तसेच दैनंदिन गरजा भागविण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तरी सबंधित लाभार्थ्यांना त्यांचे मानधन तात्काळ मिळण्यासाठी ताबडतोब कार्यवाही करावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी काँग्रेस कमिटीचे सदस्य ड.राजेंद्र ठाकरे, जगदिश पवार, ओंकार पटले, सुभाष पटले, मगन मालचे आदी उपस्थित होते.

## आरपीआय आठवले गट जिल्हाध्यक्षपदी जाधव

धुळे, दि.१३- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाची नवीन कार्यकारिणी जाहिर करण्यात आली. जिल्हाध्यक्षपदी प्रभाकर सुधाकर जाधव यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यकारिणीत जिल्हा कार्याध्यक्षपदी शशिकांत वाघ, जि.महासचिवपदी राजेंद्र सिरसाठ, जि.उपाध्यक्षपदी भरत जाधव, प्रेमानंद अहिरे, काशिनाथ साबरे, जि.सरचिटणीसपदी गौतम खंडारे, धुळे शहराध्यक्षपदी संजय बैसाणे, उद्योग जिल्हा आघाडी अमोल कबाडे, युवक जिल्हाध्यक्ष सिध्दार्थ वाघ, महिला जिल्हाध्यक्षपदी नयना दामोदर, महिला शहराध्यक्ष सरला निकम, महिला जिल्हा उपाध्यक्ष (पान ४ वर)



## सिंचन कॉलनीच्या रस्त्यावरील हॉटेलचे अतिक्रमण हटवा; रहिवाशांची मागणी

**धुळे, दि. १३ -धुळे महानगरपालिका हद्दीतील सुरत बायपास रोडलगत असलेल्या सिंचन कॉलनी (स.नं. ७६/२ब) येथील मुख्य रस्त्यापासून कॉलनीला जोडणाऱ्या रस्त्यावर झालेले अतिक्रमण तातडीने हटवून रहिवाशांसाठी रस्ता खुला करावा, अशी मागणी कॉलनीतील नागरिकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, सिंचन कॉलनी मुख्य रस्त्यापासून काही अंतरावर असून कॉलनीत ये-जा करण्यासाठी असलेल्या हक्काच्या रस्त्यावर काही व्यक्तींनी अनधिकृत (पान २ वर)

## देगावच्या महिलेची नैराश्यातून आत्महत्या

धुळे, दि.१३- मूलबाळ होत नसल्याने नैराश्यातून पंचवीस वर्षीय विवाहितेने विहिरीत उडी मारून आत्महत्या केल्याची घटना देगाव ता. शिंदखेडा येथे घडली.

वैशाली कैलास पाटील (वय २५) असे तिचे नाव आहे. देगाव शिवारात मधुकर गिरासे यांचे शेत आहे, शेतातील विहीरीत उडी मारुन तिने आत्महत्या केली. रविवारी (ता.१२) दुपारी तीनच्या सुमारास घटना उघडकीस आली. शेतातील भाईदास भिला मोरे यांनी माहिती दिली. त्यानंतर कुटुंबीय, नातेवाईकांसह ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. तिला खासगी वाहनाने ग्रामीण रुग्णालय शिंदखेडा येथे दाखल केले, तेथे डॉ. कौशल पाटील यांनी वैशाली पाटील हीच (पान २ वर)

# आपला महाराष्ट्र

## एल नीनोमुळे जगभर मोठ्या संकटांची चाहूल

राज्याच्या काही भागात गेल्या आठवड्यात अतिवृष्टी झाली.काही ठिकाणी सरासरीपेक्षा अधिक पाऊस नोंदवा गेला मात्र अजुनही विदर्भ , मराठवाडा आणि विदर्भ खान्देशात पावसाअभाव पेरण्या खोळंबल्या आहेत.पूर्व विदर्भात भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली हे जिल्हे भाताची शेती करणारे आहेत पण भात लावणीसाठी योग्य पाऊस पडला नसल्याने शेतकरी पावसाची वाट बघत आहेत

कोकणातही काही काही ठिकाणी पावसाची प्रतीक्षा आहे.खान्देशात देखील जळगाव जिल्हा वगळता धुळे नंदुरबार जिल्ह्यात निम्मे हून अधिक क्षेत्र बिगर पेरणीचे आहे इतरत्र प ऊस धो धो कोसळत असताना दोन्ही जिल्ह्यांत तो जेमतेम होता आता तर पूर्ण महाराष्ट्रात उघडीप दिलेली आहे.शिशाय तापमानात वाढ झालेली आहे..अशा परिस्थितीत पेरण्या होऊ शकत नाहीत.हा सगळा एल नीनोच्या वाढत्या प्रभावाचा परिणाम होय.असेच चालू राहिल्यास यंदा पीक पाणी जेमतेम राहील. ज्यांच्याकडे पाण्याची सोय आहे त्यांच्याकडे नगदी पिके असतील.बाकिच्यांनी म्हणजेच कोरडवाहू शेतकऱ्यांनी अधिक पावसाच्या भरवशावर येणाऱ्या पिकांची आशा करू नये. कमी पावसात येणारी पिके घ्यावीत.तसाही दीड महिन्याचा कालखंड निघून गेल्यामुळे

नगदी पिकांना फारशी अनुकूल स्थिती राहिली नाही.निसर्गाची स्थिती अशीही असली तरी आम्ही नगदी पिके घेतल्या शिवाय थांबणार नाही असा हेका या काळात चालणार नाही याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे.जगभरातील शास्त्रज्ञ, पर्यावरणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि जागरूक नागरिक हवामानातील भीषण बदलांमुळे संभाव्य प्रलयाचा इशारा अनेक वर्षांपासून देत आहेत. आता हा धोका प्रत्यक्ष आपल्या दाराशी येऊन ठेपल्याचे दिसत आहे. येणारी काही वर्षे मानवी अस्तित्वासाठी अत्यंत कठीण ठरू शकतात, असे सांगितले जात आहे.

हवामान बदल हा आता केवळ शैक्षणिक चर्चेचा किंवा भविष्यातील चिंतेचा विषय राहिलेला नाही. तो आपल्या वर्तमानावर घाला घालणारे कटू वास्तव बनला आहे. गेल्या काही वर्षांत उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशसारख्या हिमालयीन राज्यांमध्ये पावसाळ्यात ढगफुटी आणि अचानक येणाऱ्या विनाशकारी पुरांच्या घटनांमध्ये दीडपटाहून अधिक वाढ नोंदवली गेली आहे. या आपत्तींमुळे झालेली जीवित व वित्तहानी वाढते जागतिक तापमान आणि महासागरांतील उष्णतेच्या असंतुलनाशी थेट संबंधित आहे. हवामानतज्ज्ञांच्या मते, या बदलत्या आणि अधिक आक्रमक होत चाललेल्या हवामानामागे एल नीनो आणि ला नीना या सागरातील घटनांची मोठी भूमिका आहे. मानवनिर्मित जागतिक तापमानवाढीमुळे या घटना अधिक तीव्र आणि अधिक घातक बनत आहेत. मध्ये हवामानतज्ज्ञांनी सुपर एल नीनोची शक्यता व्यक्त केली असून, त्यामुळे संकट वाढणार आहे.समुद्राच्या पृष्ठभागावरील पाणी ज्या भागात असामान्यरीत्या गरम होते, तेथे हवा वर जाऊन कमी दाबाचा पट्टा तयार करते. ही उष्ण, दमट हवा मोठ्या प्रमाणात बाष्प वर घेऊन जाते. त्यामुळे दाट ढग तयार होतात आणि त्या भागात मुसळधार पाऊस पडतो. याउलट, ज्या भागात उच्च दाबाचा पट्टा तयार होतो तेथे थंड हवा खाली बसते. परिणामी ढगांची निर्मिती होत नाही, वातावरण कोरडे राहते आणि अखेरीस दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते.यीच्या अगदी उलट, प्रशांत महासागरातील हेच पाणी असामान्यरीत्या थंड झाले तर त्या स्थितीला ला नीना म्हणतात. ला नीनाच्या काळात भारतात सरासरीपेक्षा मान्सूनचा पाऊस अधिक पडतो, तर हिवाळाही अधिक प्रदीर्घ आणि कडाक्याचा असतो. एल नीनो आणि ला नीना या दोन्ही घटना मिळून हवामानाचे चक्र तयार करतात.गेल्या वर्षी प्रदीर्घ पावसाळा आपण अनुभवला तो याच कारणामुळे.

एल नीनोच्या काळात जगातील काही भागांमध्ये एकाच वेळी पूर आणि दुष्काळ अशी परस्परविरोधी परिस्थिती निर्माण होते. जेव्हा-जेव्हा एल नीनो अधिक शक्तिशाली ठरला, तेव्हा जगाने हवामानाच्या भीषण संकटांचा सामना केला आहे. विसाव्या शतकात इंडोनेशिया, मलेशिया, ऑस्ट्रेलिया आणि फिलिपिन्स हे देश पाण्याच्या तीव्र टंचाईने होरपळले; तेथील जंगलांमध्ये भीषण वणवे लागले.

भारतीय संदर्भात पाहिले तर एल नीनो मान्सूनचा सर्वात मोठा शत्रू ठरतो. एल नीनोच्या काळात भारताकडे येणारे मान्सूनचे वारे कमकुवत पडतात. परिणामी देशाला तीव्र उष्णतेचा आणि दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करावा लागतो. मध्येही जागतिक तापमानवाढ आणि एल नीनो मुळे ते वर्ष इतिहासातील सर्वाधिक उष्ण वर्षांपैकी एक ठरले होते. सध्या हे संकट आणखी गंभीर वळणावर पोहोचले आहे. प्रमुख हवामान संस्थांच्या ताज्या अंदाजानुसार, यंदा डिसेंबरपर्यंत प्रशांत महासागरात एल नीनो पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता टक्क्यांहून अधिक आहे. वर्षअखेरीस समुद्राच्या पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा तब्बल अंश सेल्सिअसने अधिक असू शकते. हे अंदाज खरे ठरले, तर जगाला सुपर एल नीनोचा सामना करावा लागेल. अशी परिस्थिती जागतिक पातळीवर शेती, अर्थव्यवस्था आणि मानवी जीवनासाठी अत्यंत घातक ठरू शकते. शास्त्रज्ञांनी असा इशारा दिला आहे की, यावेळी एल नीनो तीव्र झाला, तर येणारे वर्ष जागतिक तापमानाच्या इतिहासातील सर्व विक्रम मोडणारे ठरेल.

भारतीय उपखंडात मान्सूनचे आगमन आणि प्रगती यांची एक ठरलेली आणि शिस्तबद्ध पद्धत होती. जूनमध्ये केरळ किनारपट्टीवर धडक दिल्यानंतर जुलै आणि ऑगस्ट हे सर्वाधिक पावसाचे महिने मानले जातात. एकट्या ऑगस्ट महिन्यात सरासरी मिलिमीटर पाऊस पडतो, जो वार्षिक पर्जन्यमानाच्या सुमारे टक्के असतो. मात्र, जागतिक तापमानवाढ आणि संभाव्य सुपर एल नीनोच्या नव्या युगात मान्सूनचे हे पारंपरिक गणित पूर्णपणे अनिश्चित झाले आहे.

जागतिक तापमानवाढीमुळे वातावरणाचे तापमान वाढत असल्याने हवेत आर्द्रता साठवून ठेवण्याची क्षमता अनेक पटींनी वाढली आहे. एल नीनोमुळे महासागरांचे तापमान वाढल्याने अशा घटनांची तीव्रता भयावहरीत्या वाढत आहे. मानवनिर्मित औद्योगिक विकास आणि हरितगृह वायूंच्या अमर्याद उत्सर्जनामुळे पृथ्वीचे नैसर्गिक संरक्षणचक्र विस्कळित झाले आहे. महासागर सातत्याने तापत असल्याने एल नीनोसारख्या टोकाच्या हवामानविषयक घटना आता आक्रमक स्वरूपात घडू लागल्या आहेत.पूर आणि दुष्काळाचे जागतिक तांडव म्हणजे निसर्गाने दिलेला अखेरचा इशारा आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर यशस्वी करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करा- विसपुते




**धुळे, दि.१३- जिल्ह्यात आयोजित करण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी सूक्ष्म नियोजन करून समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, उपजिल्हाधिकारी (प्रशासन) संदीप पाटील, उपजिल्हाधिकारी महादेव खेडकर, बालाजी क्षीरसागर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गंगाराम तळपाडे, तहसीलदार प्रवीण चव्हाणके, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजन पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. गिरीष पाटील, कृषी विकास अधिकारी कावेरी राजपूत आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते म्हणाल्या की, शासनाच्या विविध महसुली सेवा नागरिकांना सुलभ, पारदर्शक आणि वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविण्यासाठी २२ जुलै ते २ ऑगस्ट,२०२६ या कालावधीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात एक दिवस मछत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरफ आयोजित करण्यात येणार आहे.

या शिबिरात जातीचे दाखले, विविध महसुली दाखले, सातबारा उताऱ्यांचे वितरण, महिला शेतकरी दर्जा प्रमाणपत्र, सनद, जिवंत सातबारा तसेच विविध विभागांच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना देण्यात यावा. एकल महिला व तृतीयपंथीय नागरिकांनाही विविध योजनांचा लाभ मिळेल यासाठी विशेष नियोजन करावे. प्रत्येक विभागाने आपापल्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ नागरिकांपर्यंत पोहोचेल, यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

अप्पर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर म्हणाले की, या शिबिरांच्या माध्यमातून प्रत्येक विधानसभा मतदारसंघात जास्तीत जास्त लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवावे. यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय साधून काम करावे. शिबिरासाठी लोकप्रतिनिधींना निमंत्रित करावे. पशुधन लसीकरण, आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिर तसेच विविध विभागांच्या योजनांचे माहिती व लाभ वितरण स्टॉल उभारावेत. तालुकास्तरावर नियोजन बैठका घ्याव्यात आणि विभागनिहाय जबाबदाऱ्या निश्चित कराव्यात. शिबिरांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती करून जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करावा.

उपजिल्हाधिकारी संदीप पाटील यांनी शिबिराच्या नियोजनाची सविस्तर माहिती दिली. बैठकीस सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच विविध विभागांचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

## जैन धर्मामधील गुणवंतांचा सत्कार

धुळे, दि.१३- जैन धर्मातील गुणवंत विद्यार्थी, शैक्षणिक संस्था तसेच आदर्श पत्रकारांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन दि.९ ऑगस्ट २०२६ रोजी नाशिक येथील धनदाई बँक्वेट हॉल येथे करण्यात आले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांना ऑन लाईन अर्ज दि.२५ जुलै पर्यंत सादर करावयाचे आहेत.

श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फन्स नवी दिल्ली राष्ट्रीय अध्यक्ष अतुल जैन, महामंत्री डॉ.अमितराय जैन यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रांतीय अध्यक्ष मोहललाल लोढा यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम होणार आहे. जैन धर्मातील दहावीत नव्वद व त्याहुन अधिक टक्के, बारावी विज्ञान शाखेत नव्वद टक्के व त्याहून अधिक, वाणिज्य शाखेत ऐंशी टक्के व त्याहुन अधिक तसेच विविध क्षेत्रात यश संपादन करणाऱ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करावयाचे आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सीए लोकेश पारख, सीए हेमराज खाबिया, मोहनलाल लोढा, कांतीलाल चोपडा, शांतीलाल दुगड, मदनलाल शिंगी, जवरीलाल भंडारी, राजेंद्र कुमट, शैलेश बाफना, श्री ऑल इंडिया जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन परिश्रम घेत आहे.

## शिरपूर तालुका दुष्काळाच्या छायेत तुरळक हजेरीमुळे शेतकरी चिंतेत

**शिरपूर, दि,१३- यावर्षी महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन उशिरा झाले आहे. उशिराने आलेल्या पावसाने काही ठिकाणी ढगफुटी सदृश्य तर काही ठिकाणी अत्यंत तुरळक प्रमाणात हजेरी लावली. धुळे जिल्ह्यात आणि प्रामुख्याने शिरपूर तालुक्यात उशिरा आलेल्या पावसाने अत्यंत तुरळक अशी हजेरी लावलेली आहे.**

शिरपूर तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात वाघाडीच्या पुढे अर्थे, विखरण, भामपूर, टेकवाडे, खामखेडा, वरुळ, भटाणे, जवखेडे, अंतुर्ली लोंढरे, तऱ्हाडी, अभाणपूर इत्यादी गावांच्या परिसरात अत्यंत कमी पाऊस झालेला आहे.


आज पर्यंत केवळ १८ मि.मि. पेक्षा कमी पाऊस या भागात असल्याने शेतकरी चिंतातूर दिसून येत आहे. ज्या शेतकऱ्यांकडे विहिरी व बोरवेलची व्यवस्था आहे त्यांनी मे व जून महिन्यात केळी, पपई, कापूस, मका पिकाची लागवड केलेली आहे. मध्यंतरी आलेल्या पावसाने पिकांना जीवदान मिळाले. परंतु जमिनीची तहान पुरेशी न भागल्याने पिकांची पाहिजे तेवढी वाढ होऊ शकली नाही.

गेल्या दहा तारखेपासून संपूर्ण तालुक्यात पावसाने उघडीप घेतलेली आहे व सोबतच सोसाट्याचा वारा व ऊन असल्याने तालुक्यात तापमान ३६ अंश सेल्सिअस एवढे झाले आहे विहीर व बोरवेल नसलेल्या शेतकऱ्यांची पिके पाण्याअभावी करपून जाण्याच्या परिस्थितीत आहेत.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार २० जुलै पर्यंत तरी अशीच ऊन व वाऱ्याची परिस्थिती राहणार आहे. कदाचित २० तारखेनंतर पाऊस पडेलही पण या मधल्या काळात उगवलेली तसेच लागवड केलेली पिके करपून जातील आणि कदाचित पुन्हा दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांच्या वाट्याला येईल असे दिसून येत आहे.

शिरपूर पंचायत समितीचे माजी उपसभापती तथा अंतुर्ली येथील आदर्श शेतकरी प्रा.पी. एस.अंतुर्लीकर यांनी या पत्रान्वये धुळे जिल्ह्याचे मा.प्रांत अधिकारी साहेब व मा.जिल्हाधिकारी साहेब यांना विनंती केलेली आहे की शिरपूर तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे आपण शासनाकडे धुळे जिल्ह्याचा व प्रामुख्याने शिरपूर तालुक्याचा दुष्काळ सदृश्य परिस्थितीचा अहवाल पाठवून धुळे जिल्ह्यामध्ये व शिरपूर तालुक्यात दुष्काळ जाहीर करावा व शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, शेतमजूर, कामगार यांच्या बाबतीत पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विविध प्रकारच्या योजनांची घोषणा करून त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू करावी. धुळे जिल्ह्याला प्रामुख्याने शिरपूर तालुक्याला दुष्काळा संबंधी योग्य तो न्याय द्यावा असे आवाहन केले आहे.

प्रकाश में आज पहेलीबार




राजेश खन्ना, जिनत अमान, प्राण, योगिता बाली, प्रेम चोपडा, प्रदीप कुमार

✻ धुळे दि.१३- शहराच्या नकाणे रोड परिसरात विजेचा लपंडाव सुरू झाल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणावर सौर उर्जेचे पॅनल बसविण्यात आलेले असतांना विज वितरणकडून खोडसाळपणा का केला जातोय ? असा सवाल सामान्य ग्राहकांमधून उपस्थित होवू लागला आहे.




### शब्दकोडे क्रमांक : २४१०



**आडवे शब्द :** १. सूर्यमालेतील सर्वात लहान ग्रह किंवा आठवड्याचा एक वार २. महाराष्ट्राचा सुंदर समुद्रकिनारा लाभलेला डोंगराळ प्रदेश ४.अकरा आणि तेरा यांच्या मध्ये येणारी संख्या ६. पावसाळ्यात पिसारा फुलवून नाचरा पक्षी ९. व्यापार किंवा कामात मिळणारी समृद्धी, लाभ किंवा भरभराट.११. भारताच्या शेजारील 'बांगलादेश' या देशाची राजधानी १३. पैशांचा अपव्यय न करता विचारपूर्वक केलेला मर्यादित खर्च १६.एखाद्या गोष्टीची सर्वत्र होणारी खूप मोठी प्रसिद्धी किंवा गाजावाजा १८.मोठा गोंधळ,राडा किंवा भांडण या अर्थाने वापरला जाणारा शब्द १९. वजनाने अतिशय भारी किंवा आकाराने मोठे असलेले सामान २०.भिंतीला किंवा कपड्याला पडलेली बारीक भेग किंवा तडा २२.दिवाळीच्या फराळातील काट्यांचा, कुरकुरीत आणि चक्राकार पदार्थ २३.'मोठा' किंवा प्रतिष्ठीत २४.दानशूर व्यक्ती २५. मानवी शरीर किंवा शरीराचा एखादा अवयव/भाग २६.वण २७. लांब पारंब्या असणारा आणि दीर्घायुष्य लाभलेला भारताचा राष्ट्रीय वृक्ष २८.हाता-पायाच्या बोटांच्या टोकावर असणारा कडक भाग २९.झाडाचे मूळ ३०. कल्ल्यांच्या साहाय्याने पाण्यात श्वास घेणारा जलचर प्राणी ३२.रागाने किंवा खेळाच्या ओघात पायाने मारलेला प्रहार ३४.'पाणी'३५.ग्रामीण बोलीत-रक्त ३७.हिंदीत-लोणचे ३९.अगदी जवळ असलेला किंवा लागून असलेला भाग ४२.रेतीवर रेघोट्या पाडून भविष्य पाहण्याची विद्या ४६. सेवा करणारा नोकर किंवा सेवक ४७.आईची बहीण ४९. रंगमंचावर किंवा चित्रपटात अभिनय करणारा कलाकार (अभिनेता)५०.पल-उलट लिहा ५१.लढाईचे मैदान किंवा युद्धभूमी ५२.एखाद्याला दिलेला त्रास उभे शब्द

**उभे शब्द :** १.विदर्भातील एक प्रसिद्ध जिल्हा -जिथे जागतिक कीर्तीचे 'लोणार सरोवर' आहे २.वसंत ऋतूत आपल्या मधुर आवाजाने 'कुहू-कुहू' गाणारा काळा पक्षी.३. हस्त/हात किंवा शासनाला द्यायचा महसूल ४. एखाद्या गोष्टीचा सखोल तपशील किंवा सूक्ष्म निरीक्षण ५.कणखर आणि मजबूत ७.आकाश किंवा समुद्रातील विमाने व जहाजे शोधून काढणारे यंत्र १०.आक्षेप,सूचना १२.नशीब १४.बायका पोरे नसलेला १५.छाया १६.गोंधळ १७.फळाच्या आतील मगज १९.बुद्धी २०.एक वेगवान धावणारा पशु २१. विदर्भातील एक शहर २२. उत्तम चव असलेला पदार्थ २४.उदाहरण २७.वारसा ३०.शह ३१. मानवी मनात येणारी कल्पना किंवा सतत चालणारे चिंतन ३३.जागा ३४.व्यवस्थित ३६.चेहऱ्यावरील मांसल भाग ३८.लिन ४०.अवस्था ४१. सोलकढी किंवा आमसूल बनवण्यासाठी वापरले जाणारे कोकणातील प्रसिद्ध आंबट फळ ४३.अंगावरील बारीक केस ४४.उदर ४५.वर्ष ४८.थंड ४९.सरीता

### शब्दकोडे क्रमांक : २४०९ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ए | क | | गु | ज | रा | त | | वि | मा | न | |
| रं | ज | ना | | ल | हू | | दु | रा | वा | | खे |
| डे | रा | | दा | द | | सु | वा | स | | पा | ट |
| ल | | रा | म | | ह | म | | त | प | की | र |
| | जी | त | | ध | | न | वा | | ल | ट | |
| चे | व | | ग | ड | प | | च | ला | क | | वे |
| टू | | बा | हू | | ना | य | ना | ट | | मा | ता |
| क | बी | र | | स | ह | | ल | | घा | या | ळ |
| | ल | | तु | ला | | मा | य | ना | | वी | |
| ना | | अ | | ह | मा | ल | | दी | न | | वे |
| ना | म | दा | र | | म | क | ब | रा | | खा | द |
| | म | नी | | ना | ला | | ट | | र | च | ना |

पान १ वरुन

## शिवाजी जनरल मार्केट पाडण्यास मनपाकडून

निर्णय घेण्यात आला आहे. आमदार अनुप अग्रवाल यांच्या प्रयतकांतून या प्रकल्पासाठी शासनाने सुमारे ५६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या प्रकल्पाअंतर्गत भाजी मार्केट व फळ मार्केटचे पाडकाम पूर्ण होऊन नव्या बांधकामालाही सुरुवात झाली आहे.

महापालिकेने शिवाजी मार्केट व शंकर मार्केटमधील व्यापाऱ्यांना यापूर्वीच दुकाने खाली करण्याच्या सूचना दिल्या होत्या. शुक्रवारी दि.१० जुलै महापालिकेच्या पथकाने पुन्हा जाऊन सोमवारी पाडकाम करण्यात येणार असल्याची अंतिम सूचना दिली होती. मात्र, त्यानंतरही बहुतांश व्यापाऱ्यांनी दुकाने खाली केली नव्हती.

सोमवारी सकाळी जेसीबीसह अतिक्रमण विभागाचे प्रसाद जाधव, अभियंता निखिल टकले, धुळे शहर व आझाद नगर पोलीस ठाण्याचे अधिकारी, सुमारे ४० पोलीस कर्मचारी, आरसीपी पथक तसेच महावितरणचे कर्मचारी अशा मोठ्या बंदोबस्तात पथक घटनास्थळी दाखल झाले. पथक आल्यानंतर व्यापाऱ्यांनी तातडीने दुकानांमधील सामान बाहेर काढण्यास सुरुवात केली. दुपारपर्यंत दुकाने खाली करण्याचे काम सुरू होते.

## किराणा दुकानातील रोकड चोरणाऱ्या

चोरुन नेले, नऊ जुलैस सकाळी घरफोडीचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांनी गोपनिय माहिती व सी.सी.टी.व्ही. फुटेजचे आधारे तपासाला वेग दिला. अवघ्या चार तासात मतीन खलील तेली, मकसूद अख्तर मेहतर (दोघे रा. लोहार गल्ली, शिरपूर) यांना ताब्यात घेत कसून चौकशी केली. पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्हयाची कबुली दिली. दोघांकडून १४ हजारांची रोकड चलनी नोटा व नाणी जप्त केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या चार तासात दोन आरोपींना अटक करुन चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक सुधीर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली शिरपूर शहर पोलीस ठाणेचे निरीक्षक किशोरकुमार परदेशी हवालदार रविंद्र अखडमल, अतुल पाटील, आरीफ तडवी, सोमा ठाकरे, सचिन वाघ, गोविंद कोळी, विनोद आखडमल, भटु साळुंके, योगेश दाभाडे, मनोज दाभाडे, प्रशांत पवार, मनोज महाजन यांनी कारवाई केली.

## बोरकुंडच्या फार्मसी महा.त बी-फार्मसी सुविधा

बोरकुंड गावातील व बोरकुंड गावा जवळील सर्व विद्यार्थ्यांनी फॉर्म भरण्यासाठी व कागदपत्रे व्हेरिफिकेशन साठी या सुविधा केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे व संस्थेच्या सचिव तथा माजी जि.प.सदस्या शालिनी भदाणे यांनी केले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.ए.अहिरराव यांनी आपणास कागदपत्र बाबतीत काही अडचणी असल्यास महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट द्यावी व आपल्या शंकांचे निरसन करावे,असे सांगितले. विद्यार्थ्यांनी सदर महाविद्यालयात येऊन फॉर्म भरावा. यामुळे फॉर्म अचूक व निशुल्क भरला जाईल. असेही आवाहन संस्थेने केले आहे.

## कंटेनर दुचाकीचा भिषण अपघात

धडक दिली. या अपघातात जितेश ऊर्फ मयूर कुलकर्णी, मुलगा खुशाल यांना गंभीर दुखापत झाली, त्यांना रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

मोनाली कुलकर्णी यांच्यावर उपचार सुरू आहेत. एकाच कुटुंबातील पिता-पुत्राच्या अपघाती मृत्यूमुळे पुरमेपाडासह परिसरात गावात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी सचिन मधुकर जोशी रा. धुळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मोहाडी नगर पोलिस ठाण्यात कंटेनर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक शिल्पा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार प्रकाश लोहार तपास करीत आहेत.

## ग्राहक पंचायत महाराष्ट्र जि.उपाध्यक्षपदी बोरसे

पॅलेस, वडगाव मावळ(पुणे) येथे होणाऱ्या ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे राज्य अधिवेशनाच्या पूर्व तयारीसाठी धुळे जिल्ह्याची बैठक ॲड.जे.टी.देसले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली होती.

जिल्हा उपाध्यक्ष डॉ.एन.के.वाणी यांनी पदाचा राजीनामा दिल्यामुळे हे पद रिक्त होते.त्या जागी जगदीश बोरसे यांची तर भास्कर पाटील यांची धुळे तालुका अध्यक्ष म्हणुन नियुक्ती करण्यात आली.प्रा.डागा राज्य कार्यकारिणीवर निमंत्रित सदस्य असले तरी त्यांचे कार्य पाहता, जिल्हा संघटक तेच राहतील व डॉ एन.के. वाणी जिल्हा कार्यकारिणी सदस्य राहतील असा निर्णय या बैठकीत सर्वसंमतीने झाला.

## सिंचन कॉलनीच्या रस्त्यावरील हॉटेलचे

बांधकाम करून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले आहे. त्यामुळे रहिवाशांना ये-जा करण्यासाठी पुरेशी जागा उरलेली नसून नागरिकांना सध्या खाजगी प्लॉटमधून ये-जा करावी लागत आहे. हक्काचा रस्ता उपलब्ध असतानाही रहिवाशांना रोजच्या प्रवासात अडचणींचा सामना करावा लागत असून, भविष्यात आपत्कालीन परिस्थितीतही गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिकांनी नमूद केले आहे. या प्रकरणात जिल्हा प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून रस्त्यावरील अतिक्रमण हटवावे आणि कॉलनीतील नागरिकांना सुरक्षित व सुलभ ये-जा करण्यासाठी रस्ता खुला करून द्यावा, अशी मागणी समस्त सिंचन कॉलनीतील महेंद्र सूर्यवंशी प्रकाश पाटील तुळशीराम बागुल स्वप्निल महाजन सचिन पाटील जितेंद्र अहिर संजय महाले किशोर पाटील शांताराम पाटील दिनकर सोनवणे विनोद सूर्यवंशी गणेश चौरे योगेश बागुल तुकाराम महाले काशिनाथ जगताप कैलास ठाकूर महेंद्र सूर्यवंशी अनघा सूर्यवंशी यांच्यासह परिसरातील महिला मोठ्या संख्येने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यासाठी उपस्थित होत्या.

## देगावच्या महिलेची नैराश्यातून आत्महत्या

मृत घोषित केले. याप्रकरणी शिंदखेडा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. विवाह होऊन चार ते पाच वर्षे झाली, परंतु त्यानंतरही मूळ बाळ होत नसल्याने वैशालीस नैराश्य आले होते. त्यातूनच तिने आत्महत्या केल्याची माहिती प्राथमिक तपासात पुढे आली. पोलीस उपनिरीक्षक माया राजपूत तपास करीत आहेत.

## ट्रकवरून पडल्याने एकाचा मृत्यू

हीचेवर चढुन ताडपत्री बांधत होते. ट्रकवरुन अचानक तोल गेल्याने खाली पडुन त्याचे डोक्याला गंभीर दुखापत झाली. व त्यातच त्योच निधन झाले.

## विद्यावर्धिनी महाविद्यालयात प्रा.संजय पाटलांचे व्याख्यान

**धुळे, दि.१३- अखिल भारतीय साहित्य परिषद नवी दिल्ली पुरस्कृत धुळे जिल्हा साहित्य भारती व विद्यावर्धिनी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाकवी कालिदास यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचा कार्यक्रम बुधवारी पंधरा जुलै रोजी सकाळी अकरा वाजता विद्यावर्धिनी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित केला आहे.**

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा संजय पाटील यांचे आषाढस्य प्रथम दिवसे या विषयावर व्याख्यान होईल. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जगदीश पाटील व प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र साहित्य भारतीचे अध्यक्ष शशिकांत घासकडबी व डॉ मंदार म्हसकर संयोजक साहित्य भरती हे असतील. या व्याख्यानास उपस्थित रहाण्याचे आवाहन संयोजक महाराष्ट्र साहित्य परिषद धुळे जिल्हा प्रतिनिधी माजी प्राचार्य संजीव गिरासे, साहित्य भारती धुळेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. किशोर पाटील, कार्याध्यक्ष प्रा.डॉ. ज्ञानेश्वर सूर्यवंशी, उपाध्यक्ष प्रभाकर शेळके, जिल्हामंत्री प्रा.डॉ. विवेकानंद पाटील, कोषाध्यक्ष प्रा.डॉ.शिवाजी पाटील, प्रवीण पवार, वृंदा राव, सारिका चव्हाण, प्रसिद्धी प्रमुख आनंद कुलकर्णी यांनी केले आहे. या प्रसंगी साहित्य भारतीचे पदाधिकारी, सभासद व धुळेकरांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांद्वारे करण्यात आले आहे.



# रोटरी क्लब निस्वार्थीपणे काम करते सर्वोतोपरी मदत करु - आ.रघुवंशी

**नंदुरबार, दि.१३ (प्रतिनिधी)- समाजाच्या हितासाठी काम करणे हे रोटरीचे ध्येय असून रोटरी क्लब ऑफ नंदनगरी त्या ध्येयाप्रती निस्वार्थी भावनेने नेहमीच कार्य करीत असते असे प्रतिपादन आ.चंद्रकांत रघुवंशी यांनी केले. ते रोटरी क्लब ऑफ नंदनगरीच्या नवव्या पदग्रहण सोहळ्याप्रसंगी बोलत होते. या वेळी आ.रघुवंशी यांनी रोटरीच्या उपक्रमासाठी सर्वतोपारी मदत करण्याचे आश्वासन दिले.**

यावेळी रोटरी ३०६० पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पिंकीबेन पटेल, हिरा उद्योग समूहाचे प्रमुख डॉ. रविंद्र चौधरी, डी.जी.ई.आशिष पटवारी, उपनगराध्यक्ष प्रथमेश चौधरी, असिस्टंट गव्हर्नर सौरभ मुनोत, खरगौन येथील ज्येष्ठ पत्रकार मनोज रघुवंशी, किशोर रघुवंशी, सुमुल पटेल, माजी अध्यक्ष विवेक जैन, माजी सचिव राहुल पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या प्रसंगी आ.चंद्रकांत रघुवंशी पुढे म्हणाले की रोटरी क्लब ऑफ नंदनगरीने सामाजिक सलोखा जपत सर्व समाज व धर्मासोबत आपले नाते जोडून ठेवले आहे. या कार्यक्रमात बोलतांना हिरा उद्योग समूहाचे डॉ.रविंद्र चौधरी म्हणाले की रोटरी क्लब ऑफ नंदनगरीचे सामाजिक कार्य वाखानन्याजोगे आहे. नंदुरबार शहरात व जिल्ह्यात जलसंधारण व वृक्षारोपणाची चळवळ रोटरी नंदनगरीने चालवावी. त्यास हिरा उद्योग समूह सर्वतोपारी सहकार्य करेल असे देखील आश्वासन त्यांनी दिले. रोटरी क्लब ऑफ नंदनगरीने नंदुरबार जिल्ह्याच्या सामाजिक गरजेनुसार रोटरीचे विविध उपक्रम राबवावेत असे आश्वासन देत जास्तीत जास्त सामाजिक कार्य करून विविध उपक्रमातून जनमानसात रोटरीचे कार्य पोहचवणे महत्वाचे आहे असे मत माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पिंकीबेन पटेल यांनी व्यक्त केला. यावेळी डी.जी.ई. आशिष पटवारी, मनोज रघुवंशी यांनी देखील मनोगत व्यक्त केले. पदग्रहण समारंभात रोटरी क्लब ऑफ नंदनगरीचे अध्यक्षपदी नंदकिशोर सूर्यवंशी तर सचिव पदी महेश रघुवंशी यांनी पदग्रहण केले. रोटरी नंदनगरीच्या सामाजिक कार्याने प्रभावित होऊन डॉ.तेजल चौधरी, राखी तंवर, अनिता सूर्यवंशी, प्रियंका जैन, लक्ष्मी पटेल यांनी सभासदत्व स्वीकारले.



# धुळे जिल्हा पतसंस्था फेडरेशनच्या उपाध्यक्षपदी भास्कर पाटलांची निवड

**धुळे, दि.१३ - येथील धुळे जिल्हा पतसंस्था फेडरेशन मर्या. धुळे संस्थेच्या दि.११जुलै २०२६ रोजी फेडरेशनच्या सभागृहात झालेल्या मासिक सभेत उपाध्यक्षपदी डॉ. भास्कर पाटील, सचिवपदी बी.टी. देवरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.**

सभेच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष लक्ष्मीकांत शहा हे होते. सभेत पतसंस्था संचालक व कर्मचारी प्रशिक्षण शिबिर घेणे, स्विकृत संचाकांची निवड करणे, रौप्य महोत्सवी वर्ष साजरा करणे सरकारी नोकरांची सह. पतसंस्थांना सभासद करून घेणे बाबबत आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी गटनेते गोपाळराव केले, उपाध्यक्ष रवींद्र वाणी, सचिव, बी.टी देवरे, डॉ. दरबारसिंग गिरासे, सुरेश जैन, शरद पाचपुते, जगदिश सुर्यवंशी, योगीता शहा, वृषाली विजय चिंचोले आदी उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित उपाध्यक्ष, सचिव व रोटरी नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश जैन यांना राष्ट्रीय मनुष्य गौरव पुरस्कार मिळाला त्याबद्दल त्यांच्या गटनेते गोपाळराव केले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.


## TEACHERS REQUIRED

TGT- Maths/Science/English
PRT- English Must be Fluent
Cricket/Volleyball coach (Part Time)
**SATGURU PUBLIC SCHOOL**
(English Medium Residential School)
Near Navalnagar, Dhule
Note:- For Female teachers, pick up and drop facility available
**Contact:- 9850731636, 9112453988**


## जाहीर नोटीसीस खुलासा

आमचे मार्फत आमचे पक्षकार वसंतदादा पाटील शुगर इन्स्टीट्युट, मांजरी (बु) ता.जि.पुणे यांनी खालील शेतकऱ्यांच्या त्यांच्या मालकीच्या व कब्जेउपभोगातील मौजे हिसपुर व जसाणे ता.शिंदखेडा जि.धुळे याबाबत दि.९/०७/२०२६ रोजी दै.आपला महाराष्ट्र, धुळे या वृत्तपत्रात जाहिर नोटिस प्रसिध्द केली होती. परंतु खालील शेतकऱ्यांनी हरकत घेतल्यामुळे तसेच खरेदी विक्रीस आक्षेप घेतल्यामुळे सदरची जाहीर नोटीस रद्द करण्यात येत आहे व सदरची जाहिर नोटिस रद्द समजण्यात यावी.

| नांव | गट नं. | क्षेत्र |
|---|---|---|
| १) शरयु भैय्यासाहेब बेहेरे | १२४/१/अ | १ हे २० आर |
| २) शरयु भैय्यासाहेब बेहेरे | १२४/१/ब | ० हे ७५ आर |
| ३) शरयु भैय्यासाहेब बेहेरे | १२४/२ | १ हे २० आर |
| ४) तुकाराम कौतीक पाटील | १२९/१ | ० हे ८० आर |
| अशोक कौतीक पाटील | --- | --- |
| निर्मला मोहन पाटील | --- | --- |
| ५) तुकाराम कौतीक पाटील | १२९/२ | ० हे ७० आर |
| ६) अशोक कौतीक पाटील | १२९/३ | ० हे ७० आर |
| ७) सुदाम रघुनाथ पाटील | २९/१ | ० हे ७५ आर |
| ८) सुदाम रघुनाथ पाटील | २९/२ | ० हे ७४ आर |
| ९) एकनाथ भटू पाटील | ३०/१ | ० हे ४२ आर |
| कैलास भटू पाटील | --- | --- |
| सकवारबाई भटू पाटील | --- | --- |
| १०) भगवान रघुनाथ पाटील | ३०/२ | ० हे ६० आर |
| सुदाम रघुनाथ पाटील | | |
| शांताबाई सुरेश पाटील | | |
| ११) एकनाथ भटू पाटील | ३१ | ० हे ३६ आर |
| १२) लताबाई बन्सीलाल पाटील | ३९/१/अ | ० हे ६० आर |
| १३) रविंद्र दयाराम पाटील | ३९/१/ब | ० हे ८६ आर |
| १४) सुभाष पितांबर पाटील | ३९/२/अ | ० हे ५६ आर |
| १५) रेखाबाई जिजाबराव पाटील | ३९/२/ब | ० हे ४२ आर |
| तुषार जिजाबराव पाटील | | |
| दिपाली जिजाबराव पाटील | | |
| प्रतिभा जिजाबराव पाटील | | |
| १६) वंदनाबाई दिगबर पाटील | ३९/२/क | ० हे ४५ आर |
| १७) वेदांत वसंत पाटील | १२८ | १ हे ७६ आर |
| शुभांगी वसंत पाटील | | |
| १८) प्रशांत विजयसिंग पाटील | १२७ | १ हे ७७ आर |
| १९) रुपाली प्रशांत पाटील | १३२ | १ हे ७७ आर |
| २०) शुभांगी विशाल पाटील | १३३ | १ हे ५० आर |
| वेदांत विशाल पाटील | | |

वरील यादीतील नावांच्या व्यक्तीशी कुठलाही खरेदी विक्रीचा व्यवहार होणार नाही.

येणे प्रमाणे जाहिर नोटिसीचा खुलासा असे.

धुळे, दिनांक- १३/७/२०२६.

**ॲड.पी.एम.चौधरी, मो.नं.९८६०७०६१७१**

## जाहीर समन्स/नोटीस

ॲड.एस.आर.हारक,
ॲड.किरण बी.घाटेसाव, निशाणी १५०

**दिंडोरी येथील म.सिव्हील जज्ज साहेब, ज्युनिअर डिव्हीजन (मा.श्रीमती पी.जी.इनामादार साहेब) दिंडोरी यांचे कोर्टात**

रे.मु.नं.: २७२/२०२३

श्री.प्रमोद पांडूरंग भालेराव ....वादी
विरूध्द
श्री.शांताराम मधुकर साळवे, वगैरे
१८. गुलाबराव झिपरू पाटील (मयत) तर्फे वारस
१८.३ सुनिता संजय शिंदे, वय : ५०, धंदा- गृहिणी,
रा.छडवेल (पखरून), ता.साक्री, जि.धुळे. ....प्रतिवादी

१. ज्याअर्थी वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द मे.कोर्टात रे.मु.नं. २७२/२०२३ अन्वये दावा दाखल केलेला असून, सदर दाव्याचे कामकाज चालू असतांनी दिनांक ३०/०३/२०१८ रोजी प्रतिवादी नंबर १८ गुलाबराव झिपरु पाटील हे मयत झालेले असल्याने त्यांचे वारस सदर दाव्यात रेकॉर्डवर घेणेकामी वादी यांनी अर्ज दिला असता मे.कोर्टाने प्रतिवादी नंबर १८ यांचे वारसांना नोटीसा काढल्या असता सदर वारसांपैकी वरीलप्रमाणे वारस नामे १८.३) सुनिता संजय शिंदे हयांना सदरचे पत्त्यावर नोटीस लागलेली नसून वादी यांना त्यांचा दुसरा पत्ता माहिती नाही.

२. त्याअर्थी सदरील जाहीर समन्स/नोटीसी व्दारे मयत प्रतिवादी नंबर १८ यांचे वारस नामे १८.३) सुनिता संजय शिंदे यांनी सदर दाव्याकामी पुढील तारीख १६/९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मे.कोर्टात स्वतः अगर वकीला मार्फत हजर राहून त्यांचे म्हणणे मांडावे वरील नमूद तारखेस मे.कोर्टात हजर न राहिल्यास तुमचे गैरहजेरीत सदरील दाव्याचे कामकाज एकतर्फा चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ही जाहीर समन्स/नोटीस आज दिनांक ८/०७/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली असे.

कळावे, ही जाहीर समन्स/नोटीस.

क.लिपीक (शिक्का) सहा.अधिक्षक
मे.दिवाणी न्यायालय, दिंडोरी मे.दिवाणी न्यायालय, दिंडोरी

✻ धुळे दि.१३- शहरात डासांचे प्रमाण वाढल्याने डासांपासून होणाऱ्या आजारांपासून बचावाकरीता कराव्या लागणाऱ्या उपय योजनांकडे महानगरपालिकेचे दुर्लक्ष झाल्याने नागरिकाना त्रास सहन करावा लागतो आहे. सरकारी तसेच खाजगी रूग्णालयांमध्ये थंडी ताप, खोकला, अंगदुखीच्या आजारांनी त्रस्त असलेल्या रूणांच्या संख्येत वाढ झाली आहे. मनपाने प्रभाग निहाय फॉगींग, अबेटींग करून डासांपासून मुक्त करावे अशी मागणी होत आहे

## CHANGE OF NAME

My Old Name was
**CHANDRAKANTH SADASHIV DEOCHAND**
My New Name is
**CHANDRAKANT DEVCHAND SANDANSHIV**
**ADD- RAILWAY STATION AT.POST.NARDANE, TAL-SHINDKHEDA, DIST.DHULE(MS)**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँकांचा, हित संबंधितांना सदर जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे धुळे येथील धुळे महानगरपालिका हद्दीतील स. नं. ४३९/१अ यातील प्लॉट नं. ७१ चे एकूण क्षेत्र १५० चौ. मी. यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र ७५ चौ. मी. यात बांधीव आर. सी. सी. बांधीव घर यास धुळे विस्तारीत क्षेत्र सि. स. नं. १६३५५ लागू आहे. त्यांची चतु:सिमा नकाशा रेकॉर्ड प्रमाणे.

येणे प्रमाणे ही मिळकत ही मुळ मालक फिरोज शेख युसुफ रा. बिलाल मस्जिद गरीब नवाज नगर, धुळे यांचे मालकीची व ताबे उपोगातील आहे. सदर मिळकत ही आमचे पक्षकार आबिद नुरमोहमंद खाटीक रा. मु. पो. बेटावद ता. शिंदखेडा जि. धुळे यांनी कायम खरेदीचा सौदा केला असून बयाणापोटी रक्कम दिलेली आहे. सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे पक्षकार हे संबंधीत व्यक्तीशी पूर्ण करणार आहेत.

तरी सर्वांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सदर मिळकत संबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित, साबंध देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपट्टा, व लीज, ताबा, गहाण, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच वा वारस हक्क, खावटी दृ म. जु. वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्याचे ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री प्रती सहीत आमचे ऑफिसात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रावर असल्यास त्या ग्राह्य धरण्यात येणार नाही व हरकती न असल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत निर्वेध व निर्बोज म्हणून खरेदी करतील. नंतर आलेल्या हरकती ह्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीत करण्यात आली आहे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे दि. १२/०७/२०२६

**ॲड.परवेज निसार तांबोळी**
३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे मो. ७०२०३८१३९४

## टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम जनता, वित्तीय संस्था, पतसंस्था, बँका यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नगांव ता. जि. धुळे येथील महानगर पालिका हद्दीमधील सर्व्हे नं. २९०/१/२/३ पैकी प्लॉट नं. ५४ ब, क्षेत्र चौ. मी. ११२, त्यास चतु:सिमा पुर्वेस प्लॉट नं. ४१अ, पश्चिमेस : ९ मी. रस्ता ७, दक्षिणेस : प्लॉट नं. ५५, प्लॉट नं. ५४ अ. हा बखळ प्लॉट श्री. ज्ञानेश्वर भिवसन माळी रा. पंचवटी मोठ्या पुला जवळ, देवपूर धुळे यांचेताबे उपभोगातील व वहिवाटीतील व स्वसंपादीत आहे.सदर बखळ प्लॉट आमचे अशिल यांनी विद्या धोंडीराम फपाळ रा.धुळे यांना कायमस्वरुपी खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे व तसेच आमचे अशिलाने बयाणापोटी रक्कम अदा केली आहे. आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार लवकरात लवकर करणार आह.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हिस्सा, अगर हितसंबंध असल्यास तसेच कोणत्याही प्रकारचा गहाण, टाच, तारणाचा अगर अन्य प्रकारचा बोजा असल्यास व सदर मिळकत कोणास दान, बक्षिस, म्हणून देण्यात आलेली असल्यास अगर इतर कोणतीही हरकत अथवा सदर मिळकतीचे खरेदीचे व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसाच्या आत लेखी स्वरुपात मुळ दस्त ऐवजसह आमचेकडे खालील पत्त्यावर हरकत नोंदवाव्या. वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकतीवर कोणाचाही हक्क नाही असे समजून पुढील व्यवहार करण्यात येईल. तद्नंतर कोणाची ही अक्षेप/हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

धुळे दि. १३/०७/२६

**ॲड.महेंद्र आर. मोरे** मो.९४२३३८५७०५
५३, प्रतापगाड, तिरुपती नगर जवळ, जी. टी. पी. कॉलनी, देवरपूर धुळे ५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे विंचूर ता. जि. धुळे येथील गट नं. १६५/२ पैकी प्लॉट नं. १६, क्षेत्र १८५.८७ चौ. मी. मिळकत मी शकुंतला बुधाजीराव पाटील यांचेकडून दि. २६/१२/१९८९रोजी रजि. खरेदीखत दस्त नोंद क्र. ५७१६/१९८९ अन्वये खरेदी केलेली आहे. मात्र सदर खरेदीखताचा दस्त ठेवलेली फाईल दि. ११/०५/२०२६ रोजी मी विंचूर विविध कार्यकारी सोसायटी चे परिसरात धुळे शहराकडे येत असतांना सकाळी १०.०० वाजेचे सुमारास माझेकडून सदरचा मुळ दस्त ठेवलेली फाईल विंचूर विविध कार्यकारी सोसायटी चे परिसरात रस्त्यात पडून सदरचा मुळ रजि. खरेदीखत दस्ताची फाईल गहाळ झालेली/हरविलेली आहे.

तरी वर नमूद रजि. खरेदीखताचा मुळ दस्त कोणासही आढळून आल्यास खालील पत्त्यावर आणून देण्यात यावा, ही विनंती. कळावे. करीता जाहीर नोटीस दिली असे.

सदरची नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारान्वये आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १३/०७/२०२६

जाहीर नोटीस देणार
**श्री. भगवान पुंजाराम बोरसे,**
रा. विंचूर विकास सोसायटी दुध डेअरी मागे विंचूर ता. जि. धुळे
मोबाईल नं.

सदरची नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारान्वये आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

**ॲड.सुभाष जी. विसपुते**
६अ, यशोदाई विशाल इस्टेट, राष्ट्रवादी भवन जवळ, स्टेशनरोड, धुळे मो. ९७३०८०३५००

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँकांना, हितसंबंधितांना सदर जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन, मौजे देवपूर येथील स.नं. ६३/७ पैकी प्लॉट नं.३० चे एकूण क्षेत्र १८५.६२ चौ.मी. यापैकी तुम्हास कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ९२.८१ चौ.मी. बखळ प्लॉट. सि.स. उतारा प्रमाणे यासी विस्तारीत सि.स.नं.१०६९२/३० चे एकूण क्षेत्र १८५.६२ चौ.मी. सत्ताप्रकर क यापैकी तुम्हास कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ९२.८१ चौ.मी. बखळ प्लॉट. यासी चतु:सीमा खालीलप्रमाणे.

पूर्वेस- ६.०० मी., स.नं.६६,
पश्चिमेस- ५.२५ मी., १२ मी. रस्ता,
दक्षिणेस- १६.५० मी., याच प्लॉट नं.३० चा उर्वरीत भाग
उत्तरेस- १६.५० मी., स.नं.६४/२

येणे प्रमाणे ही मिळकत श्री.महेंद्र अर्जुन भदाणे रा.धुळे जनरल मुखत्यार श्री.पार्थ नंदलाल खंडेलवाल रा.संभाजीनगर. यांचे ताबे उपभोगातील मालकीची होती व आहे सदर मिळकत ही आमचे पक्षकारांनी लेखी सौदा केला आहे. ह्या मिळकतीच्या खरेदीचा सौदा संबंधित पक्षकार पूर्ण करणार आहे.

तरी सर्वाना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सदर मिळकत संबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हितसंबंध देणे घेणे, मालकीहक्क, भाडेपट्टा व लीज, ताबा, गहाण, मृत्यूपत्र, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच, वा वारस हक्क, खावटी ज.मु. वैगरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्यापासून ०८ दिवसाचे आत योग्य त्या कायदेशीर कागतपत्रांसह आमचे कार्यालयात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रात आल्यास त्या ग्राह्य धरण्यात येणार नाही व हरकती न आल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत ही निर्बोज म्हणून खरेदी करतील. सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून आमचे मार्फत प्रसिद्ध करण्यात आली आहे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस होय.
धुळे, दिनांक:- १३/०७/२०२६.

**ॲड.आशा शिवकुमार डोंगरे**
(नोटरी भारत सरकार)
एफ २५, पहिला मजला, गरूड कॉम्प्लेक्स, साक्री रोड, ता.जि.धुळे.
**मो.नं.९९२३३६६१११**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे महिंदळे ता.जि.धुळे, येथील महानगरपालिका हद्दीतील नगर भूमापन क्र.२२३८ ही मिळकत श्रीमती इंदुमती उत्तम जाधव यांना रजिस्टर दस्त क्र.४५०० दि.०१/०६/२०१२ रोजी मृत्युपत्रान्वये मिळालेली होती व आहे. त्यांनी सदररची मिळकत रजिस्टर दस्त क्र.५७६०/२०२५ दि.२६/०९/२०२५ अन्वये श्रीमती सुलभा शिवाजी देवरे यांना बक्षीसपत्रान्वये दिलेली असून त्याप्रमाणे दि. ३०/१०/२०२५ मालक म्हणून त्यांचे नाव लागलेले आहे.

वर नमूद केलेली मिळकत सि.स.नं.२२३८ क्षेत्र २४६.७० चौ.मी. यासी चतु:सिमा मंजूर अभिलेखाप्रमाणे ही मिळकत श्रीमती सुलभा शिवाजी देवरे रा.नाशिक यांचे मालकीची व कब्जे उपभोगातील असून त्यावर जुने लोड बेअरिंगचे बांधकाम केलेले असून त्या मिळकतीचा कायम विक्रीचा खरेदीचा तोंडी सौदा आमचे अशिल यांच्याशी श्रीमती सुलभा शिवाजी देवरे यांनी केलेला असून त्यांनी आमच्या अशिलाकडून बयाणाची रक्कम देखील स्विकारलेली आहे.

या मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिल लवकरच पूर्ण करणार आहे. तरी सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भात कोणाचा वारस, गहाण, सौदा, खरेदी, विक्री, कर्ज, असे कोणताही व्यवहार असल्यास त्यांनी खालील नमूद केलेल्या पत्यावर ही जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत योग्य त्या मालकी हक्काच्या कागदपत्रांसह कळवावे. अथवा प्रत्येक्ष संपर्क करावा. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.. व खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस आमचे अशिलाचे दाखविलेल्या कागदपत्रावरून व दिलेल्या माहितीवरुन व त्यांनी सांगीतल्याप्रमाणे आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे, दिनांक:- १३/०७/२०२६.

**ॲड.के.टी.अहिरराव**
पत्ता- २६/२७ 'श्री श्री' साईकृपा सोसायटी, विद्यावर्धिनी कॉलेजच्या पाठीमागे साक्री रोड, धुळे.
**मो.नं.९४२२७८९७५८**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक मसुम यासीन पिंजारी रा. मेहेरगांव ता. जि. धुळे यांनी आमचे अशिलांना कायम विक्री करण्याचा सौदा केला असून सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असून ती विक्री करण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा आमच्या अशिलांना दिलेला आहे.

सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिलांना लवकरच पूर्ण करावयाचा आहे.सदरहू शेत मिळकतीच्या सात बारा उताऱ्यावर इतर हक्कात बँक ऑफ महाराष्ट्र शाखा धुळेचा पिक कर्जाचा बोजा नमूद असून या व्यतिरिक्त सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लिज, सौदा, करार, मुखत्यार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, आरक्षण, मृत्यूपत्र, सॉल्वन्सी, हितसंबंध, वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधी योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत. असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. व मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

**परिशिष्ट : मौजे कावठी ता. जि. धुळे येथील शेत जमीन गट नं. १९३/१/ब चे एकूण क्षेत्र ला. ला. १हे. ४९ आर. पोट ख. ०हे. ५० आर. आकार रु. २.००पैसे, भोगवटदार वर्ग २, यांसी चतु:सिमा मंजूर गांव नकाशाप्रमाणे.**

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १३/०७/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**
नोटरी भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे मो. ९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधिताना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे ग्रामपंचायत हद्दीतील मौजे लळींग ता. जि. धुळे येथील गट नं. ८५/३ क्षेत्र ० हे ६४ आर आकार रु. ३.७५ पैसे ची शेत मिळकत यासी चतु:सिमा.

पुर्वेस : गट नं. ८५/२, पश्चिमेस : गट नं. ८५/४, दक्षिणेस : गट नं. ८३, उत्तरेस : रस्ता.

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत श्री. भाउसाहेब दामू भदाणे यांच्या मालकी व ताबे उपभोगातील आहे. त्याबाबत ७/१२ उतारा कबजेदार सदरी मध्ये त्यांचे नांव आहे. सदरची मिळकत कायम स्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने विक्री करण्याचा करार वर नमुद मिळकत मालकांनी आमच्या अशिलांसोबत केला आहे. सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज असल्याबाबत मिळकत मालकांनी आमचे अशिलांना सांगितले आहे.

उपरोक्त प्लॉट मिळकत ही उपरोक्त नमूद मालकांच्या व्यतिरिक्त इतर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा गहाण, टांच जप्ती, बोजा, संच, हक्क, अधिकार, वहिवाट, बक्षिस, तथा खरेदी विक्री, सौदे करार, हस्तांतरण व हिस्सा व व्यवहार, अधिकार, हितसंबंध अगर अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ (सात) दिवसांचे आत आमचे कार्यालयात लेखी व मुळ कागदपत्रांसह समक्ष हरकत नोंदवावी. सबब विहित मुदतीनंतर आलेल्या हरकती उपरोक्त गट मिळकतीवर व आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. सदरची गट नं. ८५/३ शेत जमीन निर्वेध व निर्बोज आहे असे समजून आमचे पक्षकार सदरील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी..

.सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या कागदपत्रावरुन माहितीवरुन व सांगितलेप्रमाणे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे दि. १३/०७/२०२६

**ॲड.शिरीष ज. वैद्य**
पत्ता : ०४, आनंदनगर, इंदिरा गार्डन जवळ, देवपूर धुळे
मो. ९९२१४४१०८४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व बँका, पतसंस्था व वित्तीय संस्था यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे पक्षकार महेंद्र रमेश देवरे रा. मु. पो. म्हसदी ता. साक्री जि. धुळे यांचे मालकीची व ताबे उपभोगातील मिळकत.

**मिळकतीचे वर्णन** : मौजे म्हसदी ता. साक्री जि. धुळे हद्दीतील गट नं. १०६, प्लॉट नं. ४१ ब, क्षेत्रफळ ११२.५० चौ. मी. त्यासी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. ४१अ, पश्चिमेस ४२ अ, उत्तरेस : रोड, दक्षिणेस : लगत स. नं. १०५.

येणे प्रमाणे वर नमूद वर्णनाची मिळकत ही महेंद्र रमेश देवरे यांच्या मालकीची असून सदर मिळकतीचे पुर्वाश्रमीचे खरेदीखत इंदरचंद खेमचंद जैन यांचेकडून अभय सुधाकर भांडारे यांनी दस्त क्र. ४०५९ दिनांक ११/१२/२०१९अन्वये खरेदी घेतलेले सदर खरेदीखत म. दुय्यम निबंधक साो. साक्री यांचेकडे नोंदविले असून सदर मुळ दस्त खरेदी पावतीसह आमचे पक्षकार महेंद्र रमेश देवरे यांचेकडून नेर गावातील नेर फाटा परिसरात झेरॉक्स करीत असतांना दिनांक ३०/०६/२०२६ रोजी गहाळ झालेले आहे.

तरी वर नमूद मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कर्ज, तारण,गहाण, टांच, जप्ती, बोजा,अगर ताबा तबदिलीचा व्यवहार अगर हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्याचे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. तसेच सदर वर नमूद मुळ दस्त कोणासही मिळून आल्यास खाली नमूद पत्त्यावर आणून द्यावीत.

ही जाहीर नोटीस असे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहितीवरुन दाखविलेल्या कागदपत्रानुसार व दिलेल्या अधिकारान्वये आमचे मार्फत प्रसिद्ध केली असे. धुळे दि. १३/०७/२०२६

**ॲड.योगेश एस. जाधव**
११ दिघे ॲडव्होकेट चेम्बर्स, स्टेशन रोड, धुळे -१ मो. ९९२२९६८८१४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन : मौजे मोहाडी प्र. लळींग धुळे म. न. पा.हद्दीतील गट नं. १०१/२ पैकी प्लॉट नं. ८ चे एकूण क्षेत्र ५४०.७४ चौ. मी. या पैकी सामाईकातील अविभाज्य दक्षिणभागास लागून क्षेत्र ९७.८५ चौ. मी. असा बखळ प्लॉट तुम्हास कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो आमचे मालकीचा प्लॉटची चतु:सिमा मंजूर नकाशा प्रमाणे.**

वर नमूद वर्णन केलेला बखळ प्लॉट/मिळकत ही **१) नजमुन्निसा मुख्तार अहमद शेख २) तौहीद मुख्तार शेख** दोन्ही रा. माधवपुरा धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कबजे ताबे उपभोगातील आहे. सदरचे प्लॉट/मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद बखळ प्लॉट/मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांतरण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आंत आमचे खालील पत्त्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकती ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे.

धुळे दि. १३/०७/२०२६

**ॲड.लखमीचंद अ. गुजर**
ॲडव्होकेट व नोटरी
ग. नं. २, घर नं.३३२६, मुल्लावाडा, धुळे
मो. ९४२३४९३०८९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन : मौजे मोहाडी प्र. लळींग धुळे म. न. पा.हद्दीतील गट नं. १०१/२ पैकी प्लॉट नं. ८ चे एकूण क्षेत्र ५४०.७४ चौ. मी. या पैकी सामाईकातील अविभाज्य मधल्याभागाचे क्षेत्र १०२.२० चौ. मी. ११०० चौ. फुट असा बखळ प्लॉट तुम्हास कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो आमचे मालकीचा प्लॉटची चतु:सिमा मंजूर नकाशा प्रमाणे.**

वर नमूद वर्णन केलेला बखळ प्लॉट/मिळकत ही **१) नजमुन्निसा मुख्तार अहमद शेख २) आदिल हुसैन मुख्तार अहमद** दोन्ही रा. माधवपुरा धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कबजे ताबे उपभोगातील आहे. सदरचे प्लॉट/मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद बखळ प्लॉट/मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांतरण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आंत आमचे खालील पत्त्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकती ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे.

धुळे दि. १३/०७/२०२६

**ॲड.लखमीचंद अ. गुजर**
ॲडव्होकेट व नोटरी
ग. नं. २, घर नं.३३२६, मुल्लावाडा, धुळे
मो. ९४२३४९३०८९

## टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व वित्तीय संस्था, बँक, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद परिशिष्टातील बखळ प्लॉट सुजाता योगेश ब्राम्हणकर रा. धनाई पुनाई कॉलनी, मिल परिसर, धुळे. यांचे मालकी हक्काचा व ताबे उपभोगातील असून त्यांनी खालील परिशिष्टातील चतु:सिमांकीत बखळ प्लॉट आमचे अशिलांना कायमस्वरुपी विक्री करण्याचा सौदा केलेला असून बेणे स्विकारलेले आहे.

तरी खालील नमूद परिशिष्टातील मिळकतीमध्ये कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, कुळ, खरेदी विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क, व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३ दिवसांचे आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र ३ दिवसानंतर आलेल्या हरकती लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही. तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे,असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :** मौजे लळींग ता. जि. धुळे येथील गट नं. ७३/१/२/३ पैकी प्लॉट नं. २८ एकूण क्षेत्र १५५.०० चौ. मी. यापैकी आमचे अशिलास विक्री करण्याचा सौदा केला ते पश्चिमेकडील भागाचे अविभक्त क्षेत्र ७७.५० चौ. मी. यासी चतुसिमा पुर्वेस : याच प्लॉट पैकी उर्वरित क्षेत्र, पश्चिमेस : प्लॉट नं. २९, दक्षिणेस : गट नं. ७३/४/५/६ यातील प्लॉट नं. ७, उत्तरेस : ९ मी. रस्ता ही जाहीर नोटीस दिली असे. कळावे.द. १३/०७/२०२६.

**ॲड.सुभाष जी. विसपुते** मो.९७३०८ ०३५००
ॲडव्होकेट व नोटरी
६-अ, यशोदाई विशाल इस्टेट, राष्ट्रवादी भवनजवळ, स्टेशन रोड,धुळे

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे.अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सो., यांचे न्यायालयात**

दि.१०/०७/२०२६

अर्जदार जन्म-मृत्यू/रजिनं./१८/२०२६

मोहम्मद फारूक अब्दुल जब्बार अन्सारी, उ.वय-५९ वर्षे व्यवसाय- धर्मगुरू,
रा.इस्लामपूरा देवपूर ता.जि.धुळे, मो.नं.९९७५२०९५७२ ....अर्जदार
विरूध्द
धुळे महानगरपालिका, धुळे
(नोटीस निबंधक जन्म मृत्यू नोंद विभाग,
महानगरपालिका, धुळे यांचेवर करण्यात यावी.) ....जाबदेणार

ज्या अर्थी वरील अर्जदार मोहम्मद फारुक अब्दुल जब्बार अन्सारी यांचा जन्म दि.०५/०५/१९६७ रोजी इस्लामपूरा देवपूर धुळे ता.जि.धुळे येथे झालेला असून त्यांची धुळे महानगरपालिका धुळे येथील दत्परी नोंद नसल्याने व राहुन गेल्याने जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ अन्वये आज रोजी अपर तहसिलदार धुळे शहर यांचे न्यायालयात जन्माची नोंद मा.निबंधक सो. जन्म मृत्यु नोंदणी विभाग, धुळे महानगरपालिका, धुळे यांचे दप्तरी लावणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. ज्या अर्थी अर्जदार यांनी दि.०५/०५/१९६७ ही जन्म/मृत्यु तारीख असून शासकीय कामी जन्म दाखल्याची गरज असल्याचे म्हटले आहे. त्यासाठी त्यांनी खालील प्रमाणे पुरावे जोडलेले आहेत.

१. आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, २. शाळासोडल्याचा दाखला, रहिवासाचा दाखला
३. रेशनकार्ड, मालमत्ता पत्रक, ४. विजपावती, करपावती, पासपोर्ट,
५. आईचा मृत्यु दाखला, वडिलांचे मृत्यु दाखला

त्याअर्थी वरीलप्रमाणे नोंद करणेस कोणाचीही काही एक तक्रार/हरकत असल्यास त्यांनी सदर अर्जाचे चौकशीचेकामी उपरोक्त न्यायालयात दि.२५/०७/२०२६ पावेतो स्वतःअगर वकिलामार्फत धुळे येथील मे.अपर तहसिलदार सो. धुळे शहर यांचे समक्ष हजर राहावे व आपले म्हणने, तक्रार व लेखी हरकत सादर करावी. अन्यथा कोणत्याही प्रकारे हरकत न आल्यास सदर कामी चौकशी होवून अर्जदाराने नावाने जन्म/मृत्यु नोंद करुन घेण्याकामी योग्य ते आदेश निर्गमीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्यानिशी आज रोजी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून
(शिक्का) (वैशाली हिंगे)
अपर तहसिलदार धुळे शहर

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे.अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सो., यांचे न्यायालयात**

दि.१०/०७/२०२६

अर्जदार जन्म-मृत्यू/रजिनं./१९/२०२६

नाजेमाबी जमीर अहमद अन्सारी, उ.वय-५१ वर्षे व्यवसाय- धर्मगुरू,
रा.इस्लामपूरा देवपूर ता.जि.धुळे, मो.नं.९९७५२०९५७२ ....अर्जदार
विरूध्द
धुळे महानगरपालिका, धुळे
(नोटीस निबंधक जन्म मृत्यू नोंद विभाग,
महानगरपालिका, धुळे यांचेवर करण्यात यावी.) ....जाबदेणार

ज्या अर्थी वरील अर्जदार नाजेमाबी जमीर अहमद अन्सारी यांचा जन्म दि.१०/०५/१९७५ रोजी इस्लामपूरा देवपूर धुळे ता.जि.धुळे येथे झालेला असून त्यांची धुळे महानगरपालिका धुळे येथील दत्परी नोंद नसल्याने व राहुन गेल्याने जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ अन्वये आज रोजी अपर तहसिलदार धुळे शहर यांचे न्यायालयात जन्माची नोंद मा.निबंधक सो. जन्म मृत्यु नोंदणी विभाग, धुळे महानगरपालिका, धुळे यांचे दप्तरी लावणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. ज्या अर्थी अर्जदार यांनी दि.१०/०५/१९७५ ही जन्म/मृत्यु तारीख असून शासकीय कामी जन्म दाखल्याची गरज असल्याचे म्हटले आहे. त्यासाठी त्यांनी खालील प्रमाणे पुरावे जोडलेले आहेत.

१. आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, २. शाळासोडल्याचा दाखला, रहिवासाचा दाखला
३. रेशनकार्ड, मालमत्ता पत्रक, ४. विजपावती, करपावती, पासपोर्ट,
५. वडिलांचे मृत्यु दाखला

त्याअर्थी वरीलप्रमाणे नोंद करणेस कोणाचीही काही एक तक्रार/हरकत असल्यास त्यांनी सदर अर्जाचे चौकशीचेकामी उपरोक्त न्यायालयात दि.२५/०७/२०२६ पावेतो स्वतःअगर वकिलामार्फत धुळे येथील मे.अपर तहसिलदार सो. धुळे शहर यांचे समक्ष हजर राहावे व आपले म्हणने, तक्रार व लेखी हरकत सादर करावी. अन्यथा कोणत्याही प्रकारे हरकत न आल्यास सदर कामी चौकशी होवून अर्जदाराने नावाने जन्म/मृत्यु नोंद करुन घेण्याकामी योग्य ते आदेश निर्गमीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्यानिशी आज रोजी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून
(शिक्का) (वैशाली हिंगे)
अपर तहसिलदार धुळे शहर

## जाहीर नोटीस

तमाम नागरिकांना व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे देवपूर शिवारातील मिळकत यांसी सर्व्हे नं. ८ व १४ पैकी प्लॉट नं. १०५ त्यासी सिटी सर्व्हे नं. ४७८०/१०५ वर महानगरपालिकेचे रितसर परवानगी घेवून बांधीव **शकुंतलानंद अपार्टमेंट** मधील पहिला मजल्यावरील सदनिका क्र. एफ -१०३, यासी बिल्टप एरिया एकूण क्षेत्र ५५.२८ चौ. मी. ही मिळकत यासी षट:सिमा पुर्वेस : सदनिका नं. १०४, पश्चिमेस : स.नं. १४/१, दक्षिणेस : सदनिका क्र. १०२, उत्तरेस : सदनिका क्र. १०४, वर : दुसरा मजला सदनिका क्र. २०३, खाली : कॉमन पार्किंग यांसी यापुढे **सदरची मिळकत** असे उल्लेखीत केले आहे.

येणे प्रमाणे वर्णनाच्या षट:सिमा आतील सदरची मिळकत सदनिका/फ्लॅट चे मालक श्रीयुत चंद्रकांत आनंदराव बोरसे ह्यांनी त्यांच्या कायदेशीर गरजेसाठी विक्रीस काढली असून ती आमचे अशिलांस श्री. दिनेश बापू खैरनार यांना कायम विकणेचा सौदा केला आहे.

सदर सौद्यान्वये आमचे अशिल श्रीयुत चंद्रकांत आनंदराव बोरसे यांचेशी लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत. सबब सदर मिळकतीत कोणतेही प्रकारचे हक्क, वारसा हक्क, हिस्सा, हितसंबंध असल्यास तसेच सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, वारसा हक्क, हिस्सा, हितसंबंध असल्यास तसेच सदर मिळकतीत कोणतेही वापर हक्क, इजमेंट आणि अगर भाडे हक्क, सौदा पावती, बोजा, मुखत्यापत्र, वगैरे असल्यास वित्तीय संस्थेस किंवा बँकेस अगर पतपेढीकडे अगर कोणाकडेही गहाण, लिज, लिन असल्यास तसेच कोणाकडेही बक्षिस, तारण, टांच,गहाण, जप्त, असल्यास अगर कोटर्काचा मनाई आदेश अगर खावटी कर्ज असल्यास तसेच सदरहू मिळकती संबंधी कुठल्याही प्रकारच्या हस्तांतरणाचे लेखी किंवा तोंडी करार वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत आपल्या हक्काच्या कागदोपत्री पुराव्यानिशी आम्हास खालील पत्त्यावर लेखी हरकतीने कळवावे. वृत्तपत्रात परस्पर हरकत प्रसिद्धीस देवू नये. दिल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची लेखी तक्रार किंवा लेखी हरकत न आल्यास सदरहू उपरोक्त वर्णनाच्या मिळकतीचे श्रीयुत चंद्रकांत आनंदराव बोरसे हे कायदेशीर मालक व कब्जेदार असल्याचे समजून तसेच सदर मिळकत निर्बोज व निर्वेध आहे हे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाचीही कोणत्याही प्रकारे तक्रार, हरकत अगर कोणीही हक्क दाखविल्यास आणि अगर आक्षेप घेतल्यास ते आमचे अशिलांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

सदर जाहीर नोटीस पक्षकाराने सांगणेवरुन व दिलेल्या माहितीवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.धुळे दि. १३/०७/२०२६

**ॲड.पी. जी. गागरे**
पत्ता : १५, द्वारका नगर, चंद्रवेल सोसायटी जवळ, नकाणे रोड, धुळे

## पान १ वरुन

### जेजुरी-बेलसर मार्गावर विठ्ठल भक्तांच्या अपघातात

आषाढी वारीच्या पूर्वतयारीचा नियमित आढावा घेऊन वारी मार्गावरील आवश्यक कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या होत्या. पंढरपूरच्या दिशेने पायी निघालेल्या वारकऱ्यांची सुरक्षितता ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून वाहनचालकांनी अत्यंत सावधगिरीने वाहन चालवून वारक-यांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहनही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

#### कुटुंबियांना पाच लाखांची आर्थिक मदत

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनेबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. पुणे जिल्ह्यातील जेजुरीजवळ झालेल्या अपघातात तीन वारक-यांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत वेदनादायी आहे. या दुर्घटनेतील मृत वारक-यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. या अपघातातील जखमी वारकऱ्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर आवश्यक उपचार सुरू आहेत. या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना राज्य सरकारतर्फे प्रत्येकी पाच लाखांची आर्थिक मदत दिली जाईल. अशी घोषणा त्यांनी केली.

#### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची प्रतिक्रिया

वारी ही महाराष्ट्राच्या संतपरंपरेचे श्रद्धास्थान असून लाखो भाविक या सोहळ्यात सहभागी होतात. त्यामुळे वारक-यांच्या सुरक्षिततेला राज्य सरकार सर्वोच्च प्राधान्य देत असून संपूर्ण वारी मार्गावर सुरक्षा, वाहतूक व्यवस्थापन आणि आपत्कालीन यंत्रणा अधिक प्रभावीपणे कार्यरत ठेवण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिली आहे. या दु:खद दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आपण सहभागी असल्याची भावना व्यक्त करत, दिवंगत आत्म्यांना सद्गती लाभो आणि जखमी वारकरी लवकरात लवकर पूर्णपणे बरे व्हावेत, अशी प्रार्थना त्यांनी श्री विठ्ठलाच्या चरणी केली.

### सरदार सरोवर करारावर तातडीने चर्चा करा

देणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र शासनाने वनभूमीच्या ६,४८८ हेक्टर बुडीत क्षेत्रासाठी १,३१३ कोटी तसेच उर्वरित पुनर्वसनासाठी आवश्यक निधीची मागणी अनेकदा केली होती. मात्र दिल्लीतील बैठकीत महाराष्ट्राला कोणतीही वित्तीय मदत न देता उलट २७ कोटी गुजरातला देण्याचा निर्णय झाल्याची माहिती समोर येत असल्याने अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचा दावा त्यांनी केला. शेकडो प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन अद्याप अपूर्ण असून सर्वोच्च न्यायालयाच्या २००० व २००५ मधील निर्णयांनुसार पुनर्वसनाशिवाय कोणालाही बुडीत क्षेत्रात ठेवता येत नाही. अशा परिस्थितीत उर्वरित पुनर्वसनासाठी आवश्यक निधी राज्य शासन उपलब्ध करून देणार का, तसेच आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणार का, याबाबत शासनाने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी पाटकर यांनी केली आहे. सरदार सरोवर प्रकल्पाची किंमत १९८३ मध्ये सुमारे ४,२०० कोटी, १९८८ मध्ये ६,४०० कोटींपेक्षा अधिक, तर नंतर ती वाढत जाऊन ७५,००० कोटी ते ९०,००० कोटी इतकी झाल्याचे विविध स्तरांवर सांगितले गेले. या खर्चवाढीमागील कारणांचीही सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली. नर्मदा-तापी जोड योजनेमुळे सात प्रकल्पांमधून नव्याने विस्थापन, शेकडो गावे व पाड्यांवर परिणाम, तसेच पर्यावरणीय हानी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. २०१८ मध्ये संबंधित ग्रामसभांनी पेसा कायद्यानुसार विरोधाचे ठराव मंजूर केले असतानाही ही योजना पुढे रेटली जात असल्याबद्दल प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील नर्मदा खोऱ्यातील सुमारे ३०० आदिवासी गावांना आजही पाणीपुरवठ्याचा लाभ मिळालेला नसल्याचे सांगत, या भागाला प्राधान्य देऊन विकेंद्रित जलनियोजन राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. दिल्लीतील कराराची प्रत सार्वजनिक करून जलसंपदा व पुनर्वसन विभागाचे मंत्री, अधिकारी, विस्थापितांचे प्रतिनिधी आणि संबंधित संघटनांसोबत मंत्रालयात तातडीने चर्चा करूनच अंतिम निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी नूरजी वसावे, पुन्या वसावे आणि ओरसिंग पटले यांनीही केली आहे. नंदुरबार येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेण्यात आली.

### लाडकी बहिण योजना साडेतीन ह.कोटींचा दरोडा

केली आहे. मलाडकी बहीण योजनेफच्या आर्थिक व्यवस्थापनात अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. या योजनेसाठी २९,६९३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, तरीही सरकारने मंजूर बजेटपेक्षा ३,५४१ कोटी रुपये अधिक खर्च केले. या ३,५४१ कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चाबाबत सरकारकडे कोणतेही रेकॉर्ड किंवा हिशोब उपलब्ध नाही. शिवाय, या योजने अंतर्गत निधीची प्रत्यक्षात काहीही गरज नसतानाही तो काढून घेण्यात आला. विविध योजनांच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार हा भाजपा सरकारची सवय बनली आहे. ना खाऊंगा ना खाने दुंगा, म्हणणारे दिसेल तेथे खातच सुटले आहेत, असे सपकाळ म्हणाले.

महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी होणारा खर्च २६१.७८ कोटी रुपयांवरून २०२४-२५ मध्ये ३३ हजार ५५४ कोटी रुपयांवर गेला. महिला योजनावर खर्च वाढला असताना गृहनिर्माण विभागातील योजनांवरील खर्च तब्बल ५४ टक्क्यांनी कमी झाली असून पाणी पुरवठा व स्वच्छतेवरील खर्चात ३१.८१ टक्क्यांची घट झालेली आहे. पायाभूत सुविधांवरचा खर्च कमी करून लाडकी बहिण योजनेवर वाढलेल्या खर्चामुळे सेवा वितरणाच्या शाश्वततेवर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे ताशेरेही कॅगने ओढले आहेत. आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबातील मुलींसाठी असलेल्या लेक लाडकी योजनेतून ३४९० कोटी रुपये लाडकी बहिणसाठी वळवण्यात आले. याआधी सामाजिक न्याय विभागाचा निधीही लाडकी बहिण योजनेसाठी वळवण्यात आल्याचे उघड झाले आहे. हा सर्व प्रकार आर्थिक बेशिस्तीचा आहे, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

विधानसभा निवडणुकीच्यावेळी महिलांच्या मतांवर डोळा ठेवून कोणताही अभ्यास न करता लाडकी बहिण योजना सुरु केली, दरमहा १५०० रुपये देण्यात आले व सत्तेत आलो तर २१०० रुपये देण्याची घोषणा केली होती पण २१०० रुपये देणे दुरच राहिले उलट सरकारने ९२ लाख लाडक्या बहिणांनाच केवायसीच्या नावाखाली योजनेतून वगळले, हा लाडक्या बहिणांचा विश्वासघात आहे. भाजपा महायुती सरकारने लाडक्या बहिणांच्या नावावर स्वत:चे खिसे भरले. लाडक्या बहिणींचा विश्वासघात व फसवणूक करणे, लाखो बहिणींना योजनेतून वगळल्याने महाराष्ट्राची बदनामी होत नाही का? असा सवाल विचारून प्रत्येक रुपयाचा हिशोब द्यावा लागेल, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

### आरपीआय आठवले गट जिल्हाध्यक्षपदी जाधव

आरती सोनवणे, रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशन कार्याध्यक्ष धुळे शहर चंद्रमणी खैरनार, रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशन जिल्हाध्यक्षपदी ॲड.दीपक शिंदे, रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशन शहर जिल्हाध्यक्षपदी पुरूषोत्तम वाघ, धुळे जिल्हा ओबीसी जिल्हाध्यक्षपदी डॉ.भुषण पाटील, जिल्हा संघटक दामोदर सोनकांबळे, आरपीआय जिल्हा उपाध्यक्ष संजय पाटोळे, धुळे जिल्हा अल्पसंख्यांक आघाडी प्रमुखपदी युसूफ पिंजारी यांचा समावेश आहे.

### सर्वोच्च न्या.ने केंद्र व उ.प्रदेश सरकारला नोटीसा

एकाचवेळी सुणावणी करीत आहेत. सरन्यायाधिशांच्या आदेशाला उत्तर देतांना अहवाल बंद लिफाफ्यात कोर्टात सादर केला जाईल असे म्हटले. यावर सर्वोच्च न्यायालयाने एसआटीची स्थापना कोणत्या निकषांवर झाली याची माहिती देखील अहवालात देण्यास सांगितली आहे. या एसआयटीमधील सदस्यांची निवड कशी झाली. ते कोण आहेत. याची माहितीदेखील मागितली आहे. तपसा दरम्यान हाती लागलेले सिसिटीव्ही मध्ये मंदिरातील कर्मचारी कशाप्रकारे आलेल्या दानाची रक्कम आणि देणग्या मंदिराबाहेर घेऊन जायचे हे दिसून आले होते. त्यामधील एकही क्लिप हरवता किंवा डिलिट होता कामा नये असे न्यायालयाने बजावले आहे. पुढील कामकाज येत्या २० तारखेला सर्वोच्च न्यायालयात होणार आहे.

## पान १ वरुन

### जागतिक मराठी परिवार राज्याच्या विकासाचा

महाराष्ट्राची ताकद केवळ राज्याच्या भौगोलिक सीमांमध्ये नसून जगभर आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राचा गौरव वाढविणाऱ्या प्रत्येक मराठी व्यक्तीमध्ये असल्याचे सांगून त्यांनी उद्योग, व्यापार, आरोग्य, शिक्षण, तंत्रज्ञान, वित्त, संशोधन आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मराठी बांधवांचे अभिनंदन केले. परदेशात राहूनही मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि परंपरा जतन करणाऱ्या महाराष्ट्र मंडळे व सामाजिक संस्थांच्या कार्याचेही मंत्री रावल यांनी कौतुक केले. मध्यपूर्वेतील सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तेथील मराठी बांधवांच्या सुरक्षिततेबाबत महाराष्ट्र शासन संवेदनशील असल्याचे सांगून सर्वांनी स्थानिक प्रशासनाच्या सुरक्षा सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले. संयुक्त अरब अमिरातीतील इंडियन पीपल्स फोरम महा हेल्पलाइनने संकटाच्या काळात सुमारे , भारतीय पर्यटकांना सुरक्षितपणे मायदेशी परतण्यास मदत केल्याबद्दल संबंधित संस्था आणि स्वयंसेवकांचे मंत्री रावल यांनी विशेष अभिनंदन केले.

आफ्रिका खंडातील काही भागांमध्ये इबोला आणि इतर संसर्गजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी स्थानिक प्रशासन आणि आरोग्य यंत्रणांच्या सूचनांचे पालन करून स्वत:ची व कुटुंबीयांची काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमात मध्यपूर्व आणि आफ्रिका खंडातील विविध महाराष्ट्र मंडळांच्या प्रतिनिधींनी आपले अनुभव, सूचना आणि अपेक्षा व्यक्त केल्या. शासनाशी सातत्यपूर्ण संवाद आणि अधिक समन्वयाची अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

### मोहीदेतील विषबाधित दहा विद्यार्थी अद्याप रूग्णालयात

उपचार सुरू आहेत. सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती सध्या स्थिर असून ते धोक्याच्या बाहेर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी आणि जिल्हा पोलीस प्रमुख अश्विनी सानप यांनी तातडीने रुग्णालयात भेट देऊन विद्यार्थ्यांची विचारपूस केली व पालकांना धीर दिला. तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.रविवारी समाजकल्याण विभागाचे नाशिक उपायुक्त महेश वाघ, नंदुरबारचे सहाय्यक आयुक्त सुंदरसिंग वसावे यांच्यासह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी रुग्णालयात धाव घेतली. यात भाजप अनुसूचित जाती आयोगाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रदीप पानपाटील, राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपकभाई पटेल, जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजीत मोरे, शहराध्यक्ष सुरेंद्र कुवर जिल्हा परिषदेच्या माजी सभापती हेमलता शितोळे-पाटील, आरपीआय (आठवले गट) जिल्हाध्यक्ष अनिल कुवर, नगरसेवक मुनेशचंद्र जगदेव, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मोहन शेवाळे, भाजपाचे शहराध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी आदींचा समावेश होता. या सर्व नेत्यांनी प्रशासकीय यंत्रणेच्या नियोजनशून्य कारभारावर तीव्र रोष व्यक्त केला.अन्न व औषध प्रशासन आणि न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या पथकाने शनिवारी रात्रीच निवासी शाळेच्या स्वयंपाक गृहातून शिजवलेले अन्न व कच्च्या साहित्याचे नमुने जप्त केले असून स्वयंपाक गृहाला कुलूप ठोकले आहे. रुग्णालयात दाखल विद्यार्थ्यांचे रक्त व उलट्यांचे सॅम्पलही प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. लॅब रिपोर्ट आल्यानंतरच विषबाधेचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. दरम्यान शाळा, वसतिगृह आणि रुग्णालय परिसरात पालकांची मोठी गर्दी झाल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश गायकवाड, संदीप वाघ, गणेश सूर्यवंशी आणि उपनिरीक्षक विनोद पाटील यांच्यासह मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.या दुर्दैवी घटनेमुळे मोहीदे त.श. निवासी शाळेतील प्रशासकीय अनागोंदी चव्हाट्यावर आली आहे. या शाळेत एकूण १५७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सुरक्षिततेची जबाबदारी असलेल्या यंत्रणेकडून योग्य देखरेख होत नसल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. धक्कादायक बाब म्हणजे, शाळेसाठी एकूण ७ शिक्षकांची पदे मंजूर असताना प्रत्यक्षात केवळ ३ शिक्षकांवर संपूर्ण शैक्षणिक गाडा ओढला जात आहे. सहाय्यक शिक्षक रोहिदास वळवी यांच्याकडे प्रभारी मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त कार्यभार आहे, तर समाज कल्याण विभागाचे लिपिक कल्पेश माळी यांच्याकडे वॉर्डनची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. कायमस्वरूपी पूर्णवेळ अधिकाऱ्यां ऐवजी प्रभारींवर यंत्रणा चालवून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप पालकांनी केला असून या घटनेनंतर सुमारे ३० विद्यार्थ्यांनी वसतिगृह सोडून घरी जाण्यास पसंती दिली आहे.

चौकशीची मागणी

विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचे समजताच वसतिगृहावर जाऊन संपूर्ण माहिती घेतली. त्यानंतर रुग्णालयात उपचार घेत असलेल्या विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची भेट घेतली. जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुंदरसिंग वसावे यांच्याकडे दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांना या साऱ्या प्रकाराची माहिती देऊन विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात घालणाऱ्यांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

-हेमलता शितोळे-पाटील, माजी बांधकाम व आरोग्य सभापती, जि. प. नंदुरबार.

### राजकीय सूडबुद्धीतून माझ्यावर खोटा गुन्हा

तसेच तेच पत्र मंत्रालयात मुंबई येथे तेच घेऊन आल्याचे त्यांनी स्वतः शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या जबाबात स्पष्ट नमूद केले आहे. माझी भूमिका एवढीच होती की, लोकप्रतिनिधी म्हणून संबंधित नगरसेवक आणि अनेक कार्यकर्ते येत असतात त्या अनुषंगाने माझ्याकडे सामाजिक विकासकामासाठी मदत मागण्यासाठी आले. त्यानुसार मी मंत्रालयात संबंधित अधिकाऱ्यांकडे लोकप्रतिनिधी या नात्याने त्यांच्या कामाबाबत विनंती केली. महाराष्ट्रातील प्रत्येक लोकप्रतिनिधी आपल्या मतदारसंघातील विकासकामांसाठी अशीच शिफारस करत असतो. मग विकासकामासाठी शिफारस करणे हा गुन्हा आहे का? हा प्रश्न आज जनतेसमोर उभा आहे.

जर संबंधित पत्र बनावट असल्याचा आरोप असेल, तर त्या पत्राची फॉरेन्सिक तपासणी करून सत्य समोर आणावे. पत्र कुठून आले, कोणी तयार केले आणि कोणी सादर केले, याचा तपास होणे आवश्यक आहे. परंतु त्या सर्व बाबी बाजूला ठेवून केवळ शिफारस केली म्हणून माझ्यावर गुन्हा दाखल करणे हे न्याय्य नाही. यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे, कथित प्रकार मुंबईतील मंत्रालयाशी संबंधित असल्याचे सांगितले जात असताना नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यामागील कायदेशीर आधार काय, हा प्रश्नही उपस्थित होतो. जर शासनाची फसवणूक झाल्याचा दावा केला जात असेल, तर तक्रार शासनाच्या सक्षम अधिकाऱ्याने किंवा ज्यांच्या नावाचा कथित गैरवापर झाला असल्याचा आरोप आहे त्या संबंधित व्यक्तीने करणे अपेक्षित होते. या बाबींचीही निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. तसेच या प्रकरणात कथित पत्रांनंतर शासनाकडून एक रुपयाचाही निधी वितरित झालेला नाही. की त्या निधीचा वापर इतर कुठे करण्यात आलेला नाही, जर निधी चं वितरित झाला नाही तर अपहार झाल्याचा कोणताही ठोस पुरावा समोर आलेला नाही. अशा परिस्थितीत आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप कोणत्या आधारावर करण्यात आला, याचे उत्तर संबंधित यंत्रणांनी द्यावे. मी या प्रकरणातील सर्व आवश्यक कागदपत्रे आणि माझी बाजू संबंधित यंत्रणांसमोर मांडली आहे. मला न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे. सत्य लपवता येत नाही आणि ते लवकरच जनतेसमोर येईल. राजकीय सूडबुद्धीने खोटे गुन्हे दाखल करून मला मागचा ५-६ महिन्यापासून खोटं गुन्हे दाखल करून बदनाम करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचे षडयंत्र उघड होईल. मी कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही, कोणत्याही धमकीला घाबरणार नाही आणि सत्यासाठी कायदेशीर लढा शेवटपर्यंत लढत राहीन.

### गावठी कट्टा व काडतूस बाळगणाऱ्या

शस्त्र पुरवठा करणारा (मुळ स्त्रोत) याचा शोध घेण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, ज्ञानेश्वर वारे, उपनिरीक्षक अमरजित मोरे, हवालदार सदेसिंग चव्हाण, तुषार सुर्यवंशी, पंकज खैरमोडे, अमोल पाटील, अतुल निकम, जगदीश सुर्यवंशी, सिध्दार्थ निकम यांनी कारवाई केली.

# नंदुरबारला स्व.अजित पवार जयंतीनिमित्त सेवा सप्ताहास राष्ट्रवादीतर्फे विविध कार्यक्रम

**नंदुरबार, दि.१३ (प्रतिनिधी)- स्वर्गीय अजित पवार यांच्या २२ जुलै रोजी होणाऱ्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, नंदुरबार जिल्ह्याच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सेवा सप्ताहाचा शुभारंभ नंदुरबार येथील इंदिरा मंगल कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात झाला. यानिमित्त आयोजित परिसंवादात मान्यवरांनी स्वर्गीय अजित पवार यांच्या कार्याचा, नेतृत्वाचा आणि सर्वसामान्यांप्रती असलेल्या बांधिलकीचा गौरव केला.**



कार्यक्रमास राज्याचे माजी मंत्री तथा नंदुरबार जिल्ह्याचे माजी पालकमंत्री अनिल भाईदास पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते भरत माणिकराव गावित होते. सकाळी १०.१० वाजता पक्षध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर राष्ट्रगीत झाले आणि स्वर्गीय अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर झालेल्या परिसंवादात इंजि. जेलसिंग पावरा, मोहन माळी, मोहन शेवाळे, डॉ. सुरेश नाईक, राजेंद्र बावीस्कर, वाजिद सैय्यद, मकसुद खाटिक, मधुकर पाटील, सीमा सोनगरे, मालती वळवी, छोटू कुंवर, राजा ठाकरे, ॲड. दिनेश माळी, युनूस पठाण आदींनी मनोगते व्यक्त करत स्वर्गीय अजित पवार यांच्या कार्याची आठवण करून दिली.

जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजीत मोरे यांनी आपल्या भाषणात पक्ष संघटन अधिक सक्षम करून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये घवघवीत यश संपादन करणे हीच स्वर्गीय अजित पवार यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे सांगितले. तसेच नंदुरबार जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वामागे ठामपणे उभा राहील, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी अनिल भाईदास पाटील यांनी आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार नोंदणी, बूथ रचना, बूथ समित्यांचे सक्षमीकरण, बी.एल.ओ. समन्वय तसेच प्रत्येक बूथवर प्रभावी संघटन उभारणीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात नव्याने नियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरणही करण्यात आले.

कार्यक्रमास योगेश चौधरी (तळोदा पॅनल प्रमुख), अमृतकर आप्पा, संजय जवरू पाडवी, संजय मुसळदे, संगीता पाडवी, प्रकाश पवार, संतोष पराडके, सुरेंद्र कुवर, मोंटू जैन, डॉ. योगेश पाटील, के. बी. पाटील, यशवंत ठाकरे, अविनाश गावित, सुनीता शिंपी, सुरेश भाबड, रविनभाई पटेल, राजू गिरासे, लाला माला, नाना निकम, डॉ. नितीन पवार, गणेश राजे, सीमा रंगरेज, जाकिरमिया जहागीरदार, अल्ताफ पिंजरी, अमन रघुवंशी, रवि पावरा, सुकलाल भिल, विठोबा मोरे, दिलीप पवार, दीपक गिरासे, प्रतीक देसले, रविंद्र जावरे, रिशी शर्मा, संतोष मराठे, गोविंद शेवाळे, रणसिंग पाडवी, विक्रम पानपाटील, बी. के. पाडवी, बबलू कदमबांडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निंबा माळी यांनी केले. सेवा सप्ताहांतर्गत पुढील काही दिवस विविध सामाजिक, जनहित व संघटनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजीत मोरे यांनी दिली.

# अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये ट्रस्टी स्नेहा पारेखांच्या हस्ते पदप्रदान उत्साहात

शिरपूर, दि.१३- शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित शहरातील अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये शैक्षणिक वर्ष साठी पदप्रदान (इन्व्हेस्टिचर सेरिमनी) समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

लीडिंग विथ पर्पज एम्पॉवरिंग चेंज, इन्स्पायरिंग टूमॉरो या संकल्पनेवर आधारित या समारंभातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, शिस्त, सेवाभाव, जबाबदारीची जाणीव आणि संघभावना विकसित करण्याचा संदेश देण्यात आला.

यावेळी एस.व्ही.के.एम. व्यवस्थापन सदस्या तथा शिरपूर एज्युकेशन सोसायटी ट्रस्टी स्नेहा अंकित पारेख, संचालक सीए विजय भंडारी या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन व प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रमुख अतिथी स्नेहा पारेख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नेतृत्व म्हणजे केवळ अधिकार किंवा पद नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी, नि:स्वार्थ सेवा, प्रामाणिकपणा आणि सकारात्मक परिवर्तन घडविण्याची संधी असल्याचे प्रतिपादन केले. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुण विकसित होऊ शकतात, त्यासाठी आत्मविश्वास, शिस्त, संवेदनशीलता आणि सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणासोबतच सामाजिक बांधिलकी जपत नैतिक मूल्यांच्या आधारे समाजहितासाठी कार्य करणारे जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. शाळेच्या विद्यार्थी परिषदेतील पदाधिकाऱ्यांसह विविध हाऊस कॅप्टन्स, व्हाइस कॅप्टन्स, समन्वयक आणि प्राथमिक व माध्यमिक विभागातील प्रीफेक्ट्स यांचा ट्रस्टी स्नेहा अंकित पारेख, संचालक सीए विजय भंडारी या मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## निधन वार्ता

### जितेंद्र लोढा



धुळे, दि.१३ - शहरातील जितेंद्र बंसीलालजी लोढा यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा कोळवले नगर धुळे येथील निवासस्थानाहून आज दि.१४ रोजी सकाळी १० वाजता निघेल. अंतिम संस्कार श्री एकविरादेवी अमरधाम येथे होणार आहे.

### आनंदा आगळे



शहादा, दि.१३ - तालुक्यातील पुसनद येथील जेष्ठ नागरिक आनंदा रतन आगळे (६३) यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. ते धडगाव तालुक्यातील तेलखेडी येथील शासकीय आश्रम शाळेचे अधीक्षक विश्वजीत आनंदा आगळे, चेतन आनंदा आगळे, प्रशांत आनंदा आगळे यांचे वडील होत. त्यांच्यावर पुसनद येथे अंतिम संस्कार करण्यात आले.

### कमलबाई चित्ते



शहादा, दि.१३- नंदुरबार जिल्ह्यातील खर्दे गावातील कमलबाई भीमराव चित्ते यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या अशोक भीमराव चित्ते, सुरेश भीमराव चित्ते व सखुबाई प्रभाकर शिरसाठ यांच्या आई तसेच शहादा येथील दिलीप बाबुराव गुलाले, राजेंद्र बाबुराव गुलाले, योगेश बाबुराव गुलाले यांच्या मावशी होत.

**ड्रायव्हर पाहिजे**
उत्तम अनुभवी ड्रायव्हर पाहिजे आहे.
- संपर्क -
9764150555

**पाहिजे**
होलसेल एजन्सी कामासाठी मॅनेजर पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान तसेच Tally Prime चे बेसिक ज्ञान आवश्यक.
आकर्षक पगार.
– संपर्क –
Konnect Corporation
नवग्रही गल्ली नं.२, श्रीराम पेन समोर, धुळे
7020165218
9850096250

**चावी हरवली आहे**
राजवाडे बँक ते अग्रवाल नगर दरम्यान काल दुपारी ३:५० ते ४ च्या दरम्यान गोदरेजची चाबी हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील नंबरवर संपर्क करावे.
योग्य बक्षीस देण्यात येईल.
मनिष शर्मा
– संपर्क –
8459340917

**पाहिजेत**
मोहन रेस्टॉरंटसाठी कारागीर, किचन हेल्पर, वेटर, साफसफाई, अनुभवी प्राधान्य.
आकर्षक पगार
त्वरीत संपर्क साधावा.
मोहन रेस्टॉरेंट
कुमार नगर, साक्री रोड, धुळे
– संपर्क –
8888014766
8830594415

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**
इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.
–: संपर्क :–
दै.आपला महाराष्ट्र
9422286496

**पाहिजेत**
स्वर्ण पॅलेस ज्वलर्स
सेल्समन – १
सेल्समॅडम – १
हेल्पर – २
आग्रा रोड, धुळे
02562
232428/ 355891

**पाहिजेत**
दुकान कामासाठी अनुभवी माणूस–१
अनुभवी Tally ऑपरेटर (पार्टटाईम) – १
7588517770
9922415601

**पाहिजेत**
दुकान कामासाठी मुले पाहिजेत.
- संपर्क -
8329784099
9823241749

Godrej
27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर .



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे: 1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे–४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा–२५६९३९, मालेगाव–२४३१३३६, नाशिक–२५७५९८९, पुणे–९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र–रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०